**नागपूर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक २०/०६/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता कविवर्य सुरेश भट सभागृह, रेशिमबाग येथे भरलेल्या सर्वसाधारण सभेचे कार्यवृत्त.**

**उपस्थित सदस्य**

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद | आसान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १. | **३७** | **क** | **संदीप दिवाकर जोशी** | **महापौर** | |
| २. | **२०** | **ड** | **मनिषा सुनिल कोठे** | **उपमहापौर** | |
| ३. | १ | अ | महेन्द्रप्रसाद रमेश धनविजय | सदस्य | C१८ |
| ४. | १ | ब | सुषमा संजय चौधरी | सदस्या | A७ |
| ५. | १ | क | प्रमिला प्रितम मथरानी | सदस्या | C२५ |
| ६. | १ | ड | विरेन्द्र उर्फ विक्की धनश्यामदास कुकरेजा | सदस्य | C१९ |
| ७. | २ | अ | भावना संतोष लोणारे | सदस्या | D५ |
| ८. | २ | ड | मनोज दशरथ सांगोळे | सदस्य | C५ |
| ९. | ३ | अ | परसराम काशीनाथ मानवटकर | सदस्य | D२२ |
| १०. | ३ | ब | गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य | B१३ |
| ११. | ३ | क | भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या | A८ |
| १२. | ३ | ड | खान नसीम बानो मो. इब्राहिम | सदस्या | C१७ |
| १३. | ४ | अ | निरंजना महेश पाटील | सदस्या | C२१ |
| १४. | ४ | ब | शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य | B१९ |
| १५. | ४ | क | मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या | C२२ |
| १६. | ४ | ड | राजकुमार पुनाराम साहु | सदस्य | C१३ |
| १७. | ५ | क | अभिरुची अनिल राजगिरे | सदस्या | C२४ |
| १८. | ५ | ड | संजय अरुणराव चावरे | सदस्य | C१४ |
| १९. | ६ | अ | जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य | D२८ |
| २०. | ६ | ब | वंदना राजू चांदेकर | सदस्या | D३० |
| २१. | ६ | क | वैशाली अविनाश नारनवरे | सदस्या | D३१ |
| २२. | ६ | ड | मो. इब्राहिम तॉफीक अहमद | सदस्य | D२९ |
| २३. | ७ | अ | विरंका मुरलीधर भिवगडे | सदस्या | D३२ |
| २४. | ७ | क | मंगला योगीराज लांजेवार | सदस्या | D३३ |
| २५. | ७ | ड | संदीप प्रल्हाद सहारे | सदस्य | C६ |
| २६. | ८ | अ | आशा नेहरु उईके (आयेशा) | सदस्या | D८ |
| २७. | ८ | क | जिशानमुमताज मो. इरफान अंसारी | सदस्या | D१० |
| २८. | ९ | ब | संजय श्यामराव बुर्रेवार | सदस्य | D३५ |
| २९. | ९ | क | ममता महेश सहारे | सदस्या | D३४ |
| ३०. | १० | अ | साक्षी विपीन राऊत | सदस्या | D१२ |
| ३१. | १० | ब | रश्मि निलमनी धुर्वे | सदस्या | D१३ |
| ३२. | १० | ड | गार्गी प्रशांत चोपरा | सदस्या | D१४ |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद | आसान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| ३३. | ११ | अ | संदीप चंद्रभान जाधव | सदस्य | B१ |
| ३४. | ११ | ब | संगिता दिपक गिऱ्हे | सदस्या | A६ |
| ३५. | ११ | क | अर्चना विवेक पाठक | सदस्या | C३० |
| ३६. | ११ | ड | भूषण कृष्णराव शिंगणे | सदस्य | B९ |
| ३७. | १२ | अ | दर्शनी स्वानंद धवड | सदस्या | D१५ |
| ३८. | १२ | क | हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य | D२० |
| ३९. | १२ | ड | विक्रम जगदीश ग्वालबंशी | सदस्य | B८ |
| ४०. | १३ | अ | अमर हरीश बागडे | सदस्य | C१५ |
| ४१. | १३ | क | परिणिता परिणय फुके | सदस्या | C२८ |
| ४२. | १३ | ड | वर्षा जयंत ठाकरे | सदस्या | A५ |
| ४३. | १४ | अ | शिल्पा इशांत धोटे | सदस्या | C२९ |
| ४४. | १४ | ब | प्रमोद ताराचंद कौरती | सदस्य | B४० |
| ४५. | १४ | क | कमलेश दिलीप चौधरी | सदस्य | D१७ |
| ४६. | १४ | ड | प्रगती अजय पाटील | सदस्या | A१ |
| ४७. | १५ | अ | सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य | B३९ |
| ४८. | १५ | ब | उज्वला प्रकाश शर्मा | सदस्या | C२६ |
| ४९. | १५ | क | रुपा शेखर राय | सदस्या | A१८ |
| ५०. | १५ | ड | संजय अनंत बंगाले | सदस्य | B११ |
| ५१. | १६ | अ | लखन सुमेरा येरवार | सदस्य | C२० |
| ५२. | १६ | ब | वनिता सुनिल दांडेकर | सदस्या | A२१ |
| ५३. | १६ | क | तारा (लक्ष्मी) ओमप्रकाश यादव | सदस्या | A२० |
| ५४. | १६ | ड | संदीप दिवाकर जोशी | सदस्य | B४ |
| ५५. | १७ | अ | विजय गोपालराव चुटेले | सदस्य | B२० |
| ५६. | १७ | ब | लता सुनिल काडगाये | सदस्या | A१९ |
| ५७. | १७ | क | हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या | D२ |
| ५८. | १७ | ड | प्रमोद छत्रपाल चिखले | सदस्य | B२१ |
| ५९. | १८ | अ | प्रवीण प्रभाकर दटके | सदस्य | B२ |
| ६०. | १८ | ब | सुमेधा श्रीकांत देशपांडे | सदस्या | A२२ |
| ६१. | १८ | क | नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या | A२३ |
| ६२. | १८ | ड | ऋषिकेश (बंटी) नारायण शेळके | सदस्य | D२६ |
| ६३. | १९ | अ | संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य | B१४ |
| ६४. | १९ | ब | विद्या राजेश कन्हेरे | सदस्या | A९ |
| ६५. | १९ | ड | दयाशंकर चंद्रशेखर तिवारी | सदस्य | B३ |
| ६६. | २० | अ | शंकुतला वामन पारवे | सदस्या | A२५ |
| ६७. | २० | ब | यशश्री देवराम नंदनवार | सदस्या | A१० |
| ६८. | २० | क | रमेश गणपती पुणेकर | सदस्य | D१८ |
| ६९. | २१ | ब | नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य | D२४ |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद | आसान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| ७०. | २१ | ड | महेश केशवराव महाजन | सदस्य | B२२ |
| ७१. | २२ | अ | राजेश श्रावणजी घोडपागे | सदस्य | B१५ |
| ७२. | २२ | ब | वंदना वसंतराव यंगटवार | सदस्या | A२७ |
| ७३. | २२ | क | श्रध्दा विजय पाठक | सदस्या | A२८ |
| ७४. | २२ | ड | मनोज केशवराव चापले | सदस्य | B२३ |
| ७५. | २३ | अ | कांता राधेश्याम रारोकर | सदस्या | A११ |
| ७६. | २३ | ब | मनिषा आशिष धावडे | सदस्या | A२९ |
| ७७. | २३ | क | नरेंद्र (बाल्या) गोविंद बोरकर | सदस्य | B५ |
| ७८. | २३ | ड | दुनेश्वर सूर्यभान पेठे | सदस्य | C३ |
| ७९. | २४ | अ | अनिल शौकीलाल गेंडरे | सदस्य | B२४ |
| ८०. | २४ | ब | सरिता ईश्वर कावरे | सदस्या | A१३ |
| ८१. | २४ | क | चेतना राजू टांक | सदस्या | A३ |
| ८२. | २४ | ड | प्रदीप वसंतराव पोहाणे | सदस्य | B१६ |
| ८३. | २५ | अ | जयश्री योगेश्वर रारोकर | सदस्य | A३० |
| ८४. | २५ | ब | पुरुषोत्तम नागोराव हजारे | सदस्य | D१९ |
| ८५. | २५ | क | वैशाली देवचंद रोहणकर | सदस्या | A३१ |
| ८६. | २५ | ड | दिपक मोतीरामजी वाडीभस्मे | सदस्य | B२५ |
| ८७. | २६ | अ | धर्मपाल नत्थुजी मेश्राम | सदस्य | B२६ |
| ८८. | २६ | ब | समिता राजेन्द्र चकोले | सदस्या | A३२ |
| ८९. | २६ | क | मनिषा सुनिल कोठे | सदस्या | A१२ |
| ९०. | २६ | ड | जितेंद्र धनराज कुकडे | सदस्या | B२७ |
| ९१. | २७ | अ | तानाजी सुकलाजी वनवे | सदस्य | C८ |
| ९२. | २७ | ब | दिव्या दिपक धुरडे | सदस्या | A२ |
| ९३. | २७ | क | वंदना राजेश भुरे | सदस्या | A३३ |
| ९४. | २७ | ड | हरीश  सिताराम दिकोंडवार | सदस्य | B१७ |
| ९५. | २८ | अ | किशोर रतनलाल कुमेरिया | सदस्य | D४ |
| ९६. | २८ | ब | मंगलाबाई प्रशांत गवरे | सदस्या | D३ |
| ९७. | २८ | ड | विजय शंकरराव झलके | सदस्य | B२८ |
| ९८. | २९ | अ | लिला अजय हाथीबेड | सदस्य | A३५ |
| ९९. | २९ | ब | विद्या योगेश मडावी | सदस्या | A३६ |
| १००. | २९ | क | भगवान भाऊराव मेंढे | सदस्य | B२९ |
| १०१. | २९ | ड | स्वाती चंद्रकांत आखतकर | सदस्या | A१४ |
| १०२. | ३० | अ | नागेश गोविंदराव सहारे | सदस्या | B३० |
| १०३. | ३० | ब | रिता अशोक मुळे | सदस्या | A१५ |
| १०४. | ३० | क | स्नेहल सतीश बिहारे | सदस्या | A३७ |
| १०५. | ३० | ड | संजय मधुकर महाकाळकर | सदस्य | C१ |
| १०६. | ३१ | क | शीतल प्रशांत कामडे | सदस्या | A३९ |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद | आसान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १०७. | ३१ | ड | रविंद्र प्रभाकर भोयर | सदस्य | B७ |
| १०८. | ३२ | अ | अभय प्रल्हाद गोटेकर | सदस्य | B३१ |
| १०९. | ३२ | ब | कल्पना राम कुंभलकर | सदस्या | C३६ |
| ११०. | ३२ | क | रुपाली प्रशांतसिंह ठाकूर | सदस्या | C३७ |
| १११. | ३२ | ड | दिपक मारोतराव चौधरी | सदस्य | B१८ |
| ११२. | ३३ | अ | वंदना भानुदास भगत | सदस्या | C३८ |
| ११३. | ३३ | ब | भारती विकास बुंडे | सदस्या | C३९ |
| ११४. | ३३ | क | विशाखा शरद बान्ते | सदस्या | C४० |
| ११५. | ३३ | ड | मनोजकुमार धोंडुजी गावंडे | सदस्य | D२५ |
| ११६. | ३४ | अ | नागेश महादेव मानकर | सदस्य | B३२ |
| ११७. | ३४ | ब | राजेन्द्र विठ्ठलराव सोनकुसरे | सदस्य | B३३ |
| ११८. | ३४ | ड | मंगला शशांक खेकरे | सदस्या | C३२ |
| ११९. | ३५ | अ | संदीप रमेश गवई | सदस्य | B३४ |
| १२०. | ३५ | ब | जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या | A१६ |
| १२१. | ३५ | क | विशाख प्रकाश मोहोड | सदस्या | C३३ |
| १२२. | ३५ | ड | अविनाश निलकंठ ठाकरे | सदस्य | B१२ |
| १२३. | ३६ | अ | मिनाक्षी नितीन तेलगोटे | सदस्या | C३४ |
| १२४. | ३६ | ब | पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या | A१७ |
| १२५. | ३६ | क | लहुकुमार दत्तुजी बेहते | सदस्य | B३५ |
| १२६. | ३६ | ड | प्रकाश सिताराम भोयर | सदस्य | B३६ |
| १२७. | ३७ | अ | प्रमोद हरिभाऊ तभाने | सदस्य | B३७ |
| १२८. | ३७ | क | नंदा शरद जिचकार | सदस्या | B१ |
| १२९. | ३७ | ब | सोनाली शालीक कडू | सदस्या | C३५ |
| १३०. | ३७ | ड | दिलीप वामनराव दिवे | सदस्य | B३८ |
| १३१. | ३८ | अ | उज्जवला वसंतराव बनकर | सदस्या | D६ |
| १३२. | ३८ | ब | प्रफुल्ल विनोंदराव गुडधे | सदस्य | C४ |
| १३३. | ३८ | क | प्रणिता चंद्रप्रकाश शहाणे | सदस्या | D१६ |
| १३४. | ना.स. | | अग्रवाल सुनिल जिवराज | सदस्य | C९ |
| १३५. | ना.स. | | वानखेडे किशोर रामकृष्ण | सदस्य | C११ |
| १३६. | ना.स. | | गांधी निशांत गिरीश | सदस्य | C१२ |
| १३७. | ना.स. | | किशोर दामोदर जिचकार | सदस्य | D९ |

**अनुपस्थित सदस्य**

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद | आसान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १. | २ | ब | दिनेश बसंतलाल यादव | सदस्य | D२३ |
| १. | २ | क | नेहा राकेश निकोसे | सदस्या | D११ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | ५ | अ | | | |
| २. | ५ | ब | प्रवीण विलासराव भिसीकर | सदस्य | B१० |
| ३. | ७ | ब | शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहिम | सदस्य | C२ |
| ४. | ८ | ब | | | |
| ५. | ८ | ड | भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य | C७ |
| ६. | ९ | अ | स्नेहा विवेक निकोसे | सदस्या | D७ |
| ७. | ९ | ड | नरेंद्र नत्थुजी वालदे | सदस्य् | D३६ |
| ८. | १० | क | नितिश गंगाप्रसादर ग्वालबंशी | सदस्य | D२१ |
| ९. | १२ | ब | माया चिंतामन इवनाते | सदस्या | A४ |
| १०. | १३ | ब | रुतिका योगेश मसराम | सदस्या | C२७ |
| ११. | १९ | क | सरला कमलेश नायक | सदस्या | A२४ |
| १२. | २१ | अ | ज्योती श्रीधर भिसीकर | सदस्या | A२६ |
| १३. | २१ | क | आभा विजयकुमार पांडे | सदस्या | D१ |
| १४. | २८ | क | रेखा राजू साकोरे | सदस्या | A३४ |
| १५. | ३१ | अ | उषा टॉबी पॅलट | सदस्या | A३८ |
| १६. | ३१ | ब | सतीश विठ्ठलराव होले | सदस्य | B६ |
| १७. | ३४ | क | माधुरी प्रवीण ठाकरे | सदस्या | C३१ |
| १८. | ना.स. | | पोकुलवार गणेश उर्फ (मुन्ना) रामन्ना | सदस्य | C१० |

**उपस्थित अधिकारी**

**श्री. तुकाराम मुंढे — आयुक्त**
**डॉ. रंजना लाडे — निगम सचिव**

मा.महापौरजी यांनी सभेची कार्यवाही सुरु केली.

**ठराव क्रमांक ८०**:- मा.महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशान्वये निगम सचिव यांनी खालील शोक प्रस्ताव सभागृहात वाचून दाखविले आणि सभागृहाने दोन मिनिटे शांत चित्ताने उभे राहून मृतात्म्यास मूक श्रध्दांजली अर्पण करुन शोक प्रस्तावास सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**शोकप्रस्ताव**

**सदानंद फुलझेले**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विश्वासू सहकारी, दीक्षाभूमी स्मारक समितीचे कार्यवाह आणि नागपूरचे माजी उपमहापौर सदानंद फुलझेले यांचे दिनांक 15/03/2020 रोजी निधन झाले. ते 92 वर्षाचे होते.

सदानंद फुलझेले यांना आंबेडकरी चळवळीचे बाळकडू कुटुंबातून मिळाले. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना त्यांनी समता सैनिक दल व शेडयुल्ड कास्ट फेडरेशनच्या कामाला प्रत्यक्ष सुरूवात केली. 1952 साली ते रामदासपेठ मतदारसंघातून महानगरपालिकेत नगरसेवक म्हणून निवडूण आले. त्यानंतर 1956

साली त्यांची नागपूरच्या उपमहापौरपदी निवड झाली. 14 ऑक्टोंबर 1956 साली बाबासाहेबांनी नागपूरच्या भूमीत बौध्द धम्माची दीक्षा घेतली. या ऐतिहासिक सोहळयाची संपूर्ण जबाबदारी सदानंद फुलझेले यांनी सांभाळली होती. दीक्षाभूमीच्या निर्माण कार्यात त्यांची मोलाची भूमिका होती. 1963 साली त्यांची दीक्षाभूमी स्मारक समितीच्या सचिवपदी निवड झाली. तेव्हापासून ते आजतागायत तब्बल 57 वर्षापासून त्या पदावर कार्यरत होते.

## राजाभाऊ पोफळी

ज्येष्ठ पत्रकार, कामगार चळवळीतील कार्यकर्ते, रा.स्व. संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक, दै. तरूण भारतचे निवृत्त सहायक संपादक तसेच अ.भा. ग्राहक पंचायतचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष दत्तात्रेय उपाख्य राजाभाऊ गोपाळराव पोफळी यांचे दिनांक 02/03/2020 रोजी निधन झाले. ते 83 वर्षाचे होते.

## देवराव उमरेडकर

नागपूर महानगरपालिकेचे माजी महापौर देवराव गणपतराव उमरेडकर यांचे दिनांक 01/03/2020 रोजी निधन झाले. ते 52 वर्षाचे होते.

भारतीय जनता युवा मोर्चात काम करत असताना विणकर आघाडीची जबाबदारी त्यांच्याकडे होती. जागनाथ बुधवारी परिसरातून नगरसेवक म्हणून निवडून आल्यानंतर त्यांनी महापालिकेत विविध पदांवर काम केले. 5 मार्च 2007 ते 16 जून 2007 या काळात ते महापौर होते.

## जयंत लुटे

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व नागपूर महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे माजी अध्यक्ष जयंत लुटे यांचे आजारपणामुळे दिनांक 30.05.2020 रोजी निधन झाले.

नागपूर शहर काँग्रेस उपाध्यक्ष असलेले लुटे यांनी काँग्रेसमध्ये विविध पदांवर काम केले याशिवाय विविध सामाजिक संस्थाशी त्यांचा जवळचा संबंध होता.

## सुनील शिंदे

काटोल विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार सुनील शिंदे यांचे दिनांक 11.06.2020 रोजी आकस्मिक निधन झाले. ते 79 वर्षाचे होते.

श्री. सुनील शिंदे यांनी सन 1985 ते 1995 ही 10 वर्षे काटोल विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधत्व केले असून, म्हाडाचे सभापती व रोजगार हमी योजनेचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले.

## वामनराव तेलंग

दैनिक तरूण भारतचे माजी मुख्य संपादक, विदर्भ साहित्य संघाचे कार्याध्यक्ष आणि अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे माजी कार्यवाह वामनराव तेलंग यांचे दिनांक 11.06.2020 रोजी ह्रदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. ते 81 वर्षाचे होते.

## चंद्रकांता गोयल

रेल्वेमंत्री पीयूष गोयल यांच्या मातोश्री तसेच भारतीय जनता पार्टीच्या माजी आमदार चंद्रकांता गोयल यांचे दिनांक 06.06.2020 रोजी निधन झाले. ते 88 वर्षाच्या होत्या.

चंद्रकांता गोयल यांनी पक्षात अत्यंत निष्ठेचे काम केले. माटुंगा विधानसभा मतदारसंघातून भाजपाच्या उमेदवारीवर त्या तिनवेळा निवडून आल्या होत्या.

## वसंत चव्हाण

मूळचे अमरावती जिल्ह्यातील नेर पिंगळाईचे आणि नंतर नागपूरातच स्थायिक झालेले प्रख्यात चित्रकार वसंत चव्हाण यांचे दिनांक 07.06.2020 रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. ते 80 वर्षाचे होते.

वसंत चव्हाण यांनी मुंबईतील जेजे आर्टस् येथून चित्रकारितेचे शिक्षण सुवर्णपदकासह पूर्ण केल्यानंतर 1960 मध्ये नागपूरात आले. नागपूर नगरीचे उत्कृष्ट चित्रकार म्हणून त्यांची ख्याती होती.

## बाळ होले

ज्येष्ठ संगीतज्ञ आणि संगीत क्षेत्रात काम करणाऱ्या अनेकांचे मार्गदर्शक बाळासाहेब उपाख्य विराग यादवराव होले यांचे दिनांक 09.06.2020 रोजी निधन झाले. ते 75 वर्षाचे होते.

अनेक नामवंत गायकांना जाहीर मैफिलीत त्यांच्या सादरीकरणातील चूक दाखवून देण्याचे धाडस त्यांनी केले. त्यांचे सांगीतिक ज्ञान अफाट होते.

## मधुसूदन चान्सरकर

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. मधुसूदन चान्सरकर यांचे दिनांक 20.05.2020 रोजी निधन झाले. ते 90 वर्षाचे होते.

डॉ. चान्सरकर हे 1985 ते 1988 या कालावधीत विद्यापीठाचे कुलगुरू होते. त्यांची विद्वत्ता तसेच प्रशासकीय कौशल्य यामुळे ते विद्यापीठ व विद्यार्थीवर्गात लोकप्रिय होते.

**रत्नाकर मतकरी**

ज्येष्ठ साहित्यिक, नाटककार, रंगकर्मी आणि राष्ट्रीय पुरस्कार विजेते दिग्दर्शक रत्नाकर मतकरी यांचे दिनांक 29.05.2020 रोजी निधन झाले. ते 81 वर्षाचे होते.

दर्जेदार लिखाण, पक्की वैचारिक बैठक, साहित्यातील प्रयोगशीलता, अखंड नवनिर्मितीचा ध्यास, सळाळते चैतन्य, उपक्रमशीलता तसेच अंतर्मुखता, सामाजाभिमुखतेचे बहुआयामी व्यक्तिमत्व म्हणजे रत्नाकर मतकरी होते.

**सुदाम महाजन**

महापालिकेचे कामगार नेते, इंटकचे माजी कार्याध्यक्ष, नागपूर मेहतर विविध उद्देशीय सहकारी संस्थेचे उपाध्यक्ष सुदाम महाजन यांचे 26.04.2020 रोजी निधन झाले. ते 62 वर्षाचे होते.

**बाबासाहेब उत्तरवार**

नागपूरातील अनेक सांस्कृतिक चळवळींचे आधारवड असलेले, वर्धा महामार्गावरील श्रीसाई मंदीरचे संस्थापक जयवंत उपाख्य बाबासाहेब उत्तरवार यांचे दिनांक 29.04.2020 रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. ते 89 वर्षाचे होते.

श्रीसाई मंदीराच्या स्थापनेत बाबासाहेबांचे मोठे योगदान होते. निस्सीम साईभक्त असलेले बाबासाहेबांनी सहकाऱ्यांच्या मदतीने निधी गोळा केला व वर्धा महामार्गावर मंदीरासाठी जागा खरेदी केली.

**अजित जोगी**

छत्तीसगडची स्थापना झाल्यानंतर राज्याचे पहिले मुख्यमंत्री बनण्याचा मान मिळालेले अजित जोगी यांचे दिनांक 29.05.2020 रोजी निधन झाले. ते 74 वर्षाचे होते.

**दादू पांडे**

श्री गजानन महाराज जन्मस्थान प्रतिष्ठानचे अध्यक्ष धार्मिक मासिक 'गणानाम् त्वां' संपादक, धार्मिक लेखक, सामाजिक कार्यकर्ते तथा वरिष्ठ नगरसेविका श्रीमती आभा बिज्जू पांडे यांचे श्वशूर (सासरे) श्री. व्दारकाप्रसाद उपाख्य दादू पांडे यांचे दि. 19/06/2020 रोजी अल्प आजाराने निधन झाले. ते 76 वर्षाचे होते.

उपरोक्त सर्व मान्यवरांच्या निधनाबद्दल म.न.पा.च्या या सभेस अत्यंत दुःख होत आहे. ईश्वर मृतात्म्यास शांती देवो व त्यांच्या कुटुंबीयांवर ओढविलेल्या या दुःखद प्रसंगी त्यांना तोंड देण्यास धैर्य प्रदान करो, हीच प्रभू चरणी प्रार्थना.

## शोक प्रस्ताव

नागपूर शहरात कोव्हिड – 19 चा प्रादुर्भाव झाल्यानंतर संपूर्ण भारतातील आरोग्य यंत्रणा, जिल्हा प्रशासन, मनपा व नगरपालिका प्रशासन आणि पोलिस प्रशासन यांनी कोरोना योध्दा म्हणून आपली भूमिका चोखपणे बजावली आहे. या काळात योध्दा म्हणून कार्यरत असताना काहींना कोरोनाची लागण झाली आणि त्यात त्यांचा मृत्यू झाला. याबद्दल म.न.पा.च्या या सभागृहास अत्यंत दुःख होत आहे. हे सभागृह मृत कोरोना योध्दांच्या कुटुंबीयांना झालेल्या दुःखात सहभागी आहे. त्यांच्याप्रती आपल्या संवेदना व्यक्त करते.

यानंतर मा.महापौरजी यांनी २ मिनिटे उभे राहून मृतात्म्यास श्रध्दांजली अर्पण केली.
वंदे मातरम नंतर संविधानाच्या प्रस्ताविकाचे वाचन करण्यात आले.
तदनंतर मा. महापौर यांनी सभेची कार्यवाही सुरु केली.

**ठराव क्रमांक ८१**:- मा.महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशानुसार निगम सचिव यांनी खालील अभिनंदन प्रस्ताव सभागृहात वाचून दाखविले आणि सभागृहाने त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मंजुरी प्रदान केली.

## अभिनंदन प्रस्ताव

### डॉ. हर्षवर्धन

केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री डॉ. हर्षवर्धन यांची प्रतिष्ठेच्या अशा जागतिक आरोग्य संघटनेच्या कार्यकारी मंडळाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

### उध्दव ठाकरे / प्रवीण दटके

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. उध्दव ठाकरे तसेच नागपूर नगरीचे माजी महापौर व नागपूर शहर भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ नगरसेवक श्री. प्रवीण दटके यांच्यासह विधान परिषदेच्या सदस्यपदी अविरोध निवडून आलेल्या सर्व नवनिर्वाचित आमदारांचे नागपूर महानगरपालिकेची ही सभा विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

### कुंदा विजयकर

लोकमाता सुमतीताई स्मृती प्रतिष्ठानच्या अध्यक्षपदी माजी महापौर कुंदा विजयकर यांची निवड करण्यात आल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

### रश्मी ऊर्ध्वरेषे

आपल्या प्रेरणादायी कार्याने समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यात मोलाची भूमिका बजावणाऱ्या मूळ नागपूरच्या रश्मी ऊर्ध्वरेषे यांना भारताचे महामहिम राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते

''नारी शक्ती पुरस्काराने' सन्मानीत करण्यात आल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**अभिनंदन प्रस्ताव**

मार्च महिन्यात कोव्हिड– 19 चा पहिला रूग्ण नागपूरात सापडला. या पार्श्वभूमीवर आरोग्य यंत्रणा सज्ज झाली. कोरोना विरूध्द युध्द लढण्यासाठी मनपाच्या आरोग्य यंत्रणे बरोबरच नागपूर विभागाचे विभागीय आयुक्त डॉ. संजीव कुमार, अपर आयुक्त श्री. अभिजीत बांगर, जिल्हाधिकारी श्री. रविंद्र ठाकरे, पोलीस आयुक्त डॉ. भूषणकुमार उपाध्याय, सहपोलीस आयुक्त डॉ. निलेश भरणे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. सजल मित्रा, इंदीरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. अजय केवलीया, अखिल भारतीय आर्युविज्ञान संस्था (एम्स) नागपूरच्या संचालक डॉ. विभा दत्ता यांच्यासह त्यांचे सर्व अधिकारी, कर्मचारी, परिचारिका, सफाई कर्मचारी व संबंधित सर्व व्यक्तींनी कोरोना योध्दा म्हणून आपली भूमिका चोखपणे बजावली आणि बजावत आहेत. लॉकडाऊनच्या काळात पोलिस यंत्रणा दिवसरात्र राबत होती. प्रतिबंधित क्षेत्रात त्यांनी कडा पहारा दिला. याचकाळात मनपा प्रशासन, पोलिस प्रशासनासह अनेक सेवाभावी संस्थांनी श्रमिक, मजूर, गरीब, दिव्यांग, ज्येष्ठ नागरिकांना अन्न व इतर अत्यावश्यक सोयी उपलब्ध करून दिल्यात. या सर्व कोरोना योध्दयांचे त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करते

महापौर :- सभेच्या कार्यवाहीस सुरुवात करण्यात येत आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, सभागृह सुरु होण्याअगोदर या ठिकाणी दोन ते तीन नविन अधिकारी रुजु झालेले आहे. सभागृहाला त्या सर्व अधिका-यांचा परिचय होणे क्रमप्राप्त आहे त्याप्रमाणे सर्व अधिका-यांचा परिचय होणे अभिप्रेत आहे.

महापौर :- महानगरपालिकेत नव्याने रुजु झालेल्या अधिका-यांनी सभेत परिचय दयावा.

अति.आयुक्त (श्री.संजय निपाणे) :- मा.महापौरजी, मा.सभागृह, मा.आयुक्त, मी संजय निपाणे, अति.आयुक्त मी नागपूर महानगरपालिकेत १५ मे रोजी रुजु झालेलो आहे.

प्रमुख लेखा व वित्त्त अधिकारी (श्री.हेमंत ठाकरे) :- मा.महापौरजी, मा.सभागृह, मा.आयुक्त, मी हेमंत ठाकरे प्रमुख लेखा व व वित्त अधिकारी म्हणुन महानगरपालिकेत रुजु झालेलो आहे.

श्री.संदीप जाधव :- मा.महापौरजी, सभागृहात काही नविन वैद्यकीय अधिकारी व सहा.आयुक्त सुध्दा नव्याने महानगरपालिकेत रुजु झालेले आहे त्यांचा सुध्दा परिचय सभागृहात झाला पाहिजे.

वैद्यकीय अधिकारी (डॉ.योगेद्र सवई) :- मा.महापौरजी मा.सभागृह, मी डॉ.योगेंद्र सवई प्राध्यापक आहे सार्वजनिक आरोग्य विभाग माता कचेरी मध्ये आणि सेवा अधिग्रहणानुसार नागपूर महानगरपालिकेत आरोग्य अधिकारी म्हणुन काम करीत आहे.

सहा.आयुक्त (कु.सुषमा मांडवे) :- मा.महापौरजी मा.सभागृह, मी सुषमा मांडवे, प्रोबेशनरी सहा.आयुक्त हनुमाननगर झोन, २०१७ च्या राज्य लोकसेवा आयोगामध्ये माझी नियुक्त झाली आहे.

सहा.आयुक्त (श्रीमती साधना पाटील) :- मा.महापौरजी मा.सभागृह, मी साधना पाटील १४ फेबुवारी रोजी महानगरपालिकेत रुजु झालेली आहे.

महापौर :- प्रश्नोत्तराला आपण सुरुवात करुया

श्री.दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, एक विषय आपके माध्यम से मै सदन के सामने रखना चॉहता

हु, प्रशासन चलाते समय महानगरपालिका के अधिकारी और कर्मचारी इनके लिये आचारसंहिता होती है, कोड ऑफ कंडक्ट होते है, मा.महापौरजी मै आपके माध्यम से आदरणीय आयुक्त महोदय से पुछना चॉहता हु कि, मा .आयुक्त् महोदय ने किसी को ऑफीस हिअरिंग के लिये बुलाया और उनके ऑफीस के बाहर उस अधिकारी के पक्ष मे नारे लगाये जा रहे हो तो ऐंसी अवस्था मे उनके उपर क्या कारवाई होती है l

निगम आयुक्त :- सन्माननिय महापौर, सन्माननिय सभागृह, मला माहित नाही की कोणत्या ईव्हेंटच्या बाबतीत बोलत आहे. नारे कोण लावत आहे हे मला माहित नाही.

श्री.दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, माझा प्रश्न अगदी सरळ आहे मा.आयुक्तांनी एखादया व्यक्तीला आपल्या कॅबीनमध्ये बोलाविले आणि तो कॅबिनमध्ये गेल्यानंतर त्यांचे समर्थक बाहेर उभे राहुन नारे लावतील तर त्याच्यावर काय डिसीप्लीनरी ॲक्शन घेण्यासाठी आयुक्तांना अधिकार आहे . आणि आयुक्त त्यांच्यावर कोणत्या अधिकाराचा वापर करुन नोटीस देवु शकतात, शो कॉज देतात कि काय करतात.

निगम आयुक्त :- सन्माननिय महापौर, सन्माननिय सभागृह, मी परत रिपीट करतो मला आठवत नाही कोणती हिअरींग आहे आणि कोणत्या नारेबाजीचे सांगत आहे.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, त्यांच्या डोक्यात एक प्रश्न आहे, उदया समजा तालेवार साहेबांना मा.आयुक्तांनी त्यांच्या कक्षेत बोलाविले मी उदाहरण सांगत आहे. त्यांचे कोणी जे.ई. डिप्टी, टी.ए. ठेकेदार साहेबांच्या बाबतीत जिंदाबाद, मुर्दाबाद अशा घोषणा देत असतील तर मा.आयुक्त अशा अधिका-यांवर कोणत्या नियमाअंतर्गत कोणत्या कलमा अंतर्गत कारवाई करु शकतात, करु शकतात की नाही करु शकत, केली तर ती कशाप्रकारे असेल, ती सिव्हील असेल की फौजदारी स्वरुपाची असेल असा एक साधा प्रश्न आहे तो काही इव्हेंटचा मुद्या नाही.

निगम आयुक्त :- मा.महापौरजी, हायपोथॅटीकल सिच्युवेशनला मी उत्तर देऊ शकत नाही. डिसीप्लीन जर ब्रेक झाली असेल तर त्यांच्यावर डिसीप्लीन रुल नुसार कारवाई होऊ शकते.....

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, मा.निगम सचिव महोदय येथे बसले आहे आपल्या एम.एम.सी. ॲक्ट मध्ये कुठले डिसीप्लीनरी कायदे आहे त्याचे वाचन सचिवांनी करावे जर त्यांना माहिती नसेल तर कारण की वेळेवर प्रश्न आला त्यामुळे सभागृह १० प्रश्न झाल्यानंतर जेव्हा सभागृह चालणार आहे तेव्हा उत्तर दयावे उद्या चुकीचे उत्तर आले तर अडचणीचे जाईल. शेवटी कर्मचा-यांच्या संदर्भात हा विषय आहे त्यामुळे नसेल माहिती तर जे अनुभवी अति.आयुक्त बसले आहे, उपायुक्त आहे त्यांना विचारुन सांगा परंतु चुकीचे उत्तर देऊ नका कारण की मला एका प्रश्नावर चुकीचे उत्तर मिळाले आहे म्हणुन मी सांगत आहे.

निगम सचिव :- मा.महापौरजी, कार्यालयीन कर्तव्य पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध याच्या अंतर्गत जी शिस्त भंगाची कारवाई महानगरपालिकेत होते ते उपलब्ध आहे.

श्री.दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, यांच्याकडे काय उपलब्ध आहे हे मी विचारत नाही. माझा स्पेसिफीक प्रश्न आहे. मा.आयुक्त या नगरीचे, नागपूर महानगरपालिकेचे सर्वोच्च अधिकारी आहे. यांना आपल्या कॅबिनमध्ये एक्सप्लेनेशनसाठी कोणत्याही अधिका-यांना बोलाविण्याची मुबलक सुट आहे. कोणताही अधिकारी जर त्यांच्या कॅबिनमध्ये गेले आणि ते कॅबिनमध्ये जात असतांना त्याच्या सोबत इंजिनिअर असेल, त्याचे समर्थक ठेकेदार लोक जेई, त्याचा क्लर्क हे सर्व बाहेर राहुन त्याच्या समर्थनार्थ “तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है” असे नारे लावत असेल तर अशा स्थितीत त्या अधिका-यांवर कायदेभंगाची काय कारवाई होऊ शकते ते स्पेसीफीक आपण सांगावे मी सांगत आहे म्हणुन तुम्ही ऐकुन घ्या हे बरोबर नाही. याच्यासोबत मा.महापौरजी, माझी इंग्रजी बरोबर नाही म्हणुन हे हायपोथॅटीकल म्हणजे

काय होते मराठी किंवा हिंदीमध्ये सांगितले तर  बरे होईल,

निगम सचिव :- मा.महापौरजी, नगरपालिका अधिकारी किंवा कर्मचारी यांच्यावर शास्ती लागून **(वाचले)**

श्री.दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, हायपोथेटीकल म्हणजे काय ?

निगम सचिव :- मा.महापौरजी, मला असे वाटते की काल्पनिक आहे.

श्री.दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, मेरे लिये आश्चर्य का विषय है महानगरपालिका के निगम सचिव ते जर म्हणत असेल की मला असे वाटते की असे असावे आम्ही शिकलेले नाही,  सामान्य जनतेमध्ये स्लममध्ये राहणा-या लोकांपैकी आम्हाला काय हायपोथेटीकल हा शब्द समजेल मा.महापौरजी, पण जसे त्यांनी सांगितले त्यानुसार त्यांनी त्याचा अर्थ काल्पनिक असा सांगितला. मा.महापौरजी, मी विनम्रपणे सांगु इच्छितो मा.आयुक्त उभे राहिले आणि त्यांनी सांगितले, कोणत्या ईव्हेंटबद्यल आपण विचारत आहात, एखादा माणुस गुंगीमध्ये असला झोपेत असला त्याला आपण  विचारले तर तो त्याच्या डोक्यात जे सुरु असते तेच त्याच्या तोंडावर येते आणि ईव्हेंट हा डोक्यातुन सुरु असलेला विषय आहे. तो ईव्हेंट महानगरपालिकेच्या सभागृहाच्या बाहेर नारे लावण्याचा असो, किंवा बाकीच्या बाबतीत मा.महापौरजी हा इव्हेंट सुध्दा हायपोथेटकील आहे असे म्हणायला काही हरकत नाही. आणि जे काही येथे निगम सचिवांनी सांगितले आयुक्त स्वत:ला तर शिक्षा देऊ शकत नाही. कमीत कमी हा गैरप्रकार हा भोंगळ कारभार नागपूर महानगरपालिकेचा सर्वाधिकारी करीत आहे. त्याच्यावर कारवाई करण्यासाठी राज्य शासनाकडे निर्देश जाण्याचे हे सभागृह वाट पाहत आाहे काय, काय दयावे आणि त्याचा ईव्हेंट करायचा की नाही. इव्हेंट म्हणजे सांगायची आवश्यकता नाही. बाहेर कंडक्टर उभे आहे ज्यांना पगार नाही मिळाला ते नारे लावत नाही. कारण ते भाडयाचे टट्टु नाही. तीन -तिन महिन्यापासून त्यांना पगार मिळाला नाही. पण प्रशासन ठस्स आहे जे इव्हेट करीत आहे. हे या सभागृहाच्या लक्षात आणण्यासाठी मी मुद्याम प्रश्न विचारत आहे. याच्यावर आताच निर्णय घ्यावा असे म्हणणे नाही अनेक फाईल सहा-सहा महिन्यांपासून प्रलंबित आहे. ७४ (क) प्रमाणे कारवाई करावी अकाउंट ऑफीसर निघुन गेले हे सर्व प्रकरण आहे. अनेक फाईल ६-६ महिन्यापासून प्रलंबित आहे त्यामुळे सभा होण्याच्या पुर्वी कधी तरी आपण याच्यावर निर्णय दयावा असे माझे म्हणणे आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, हा विषय काही कळुन राहिला नाही. येथे हिअरींग कोणाचे चालु आहे, नारे कोणाचे लागुन राहिले आहे  मी सकाळी ११ वाजता पासून सभागृहात आलो आहे परंतु माझ्या कानावरती असे आलेले नाही. येथे आपण विषय पत्रिकेच्या अनुषंगाने  सभा बोलाविली आहे. आणि जो प्रश्न सन्माननिय दया भैय्यांनी उपस्थित केला ती हिअरींग कोणाची आहे याची माहिती जाणुन घेण्याची उत्सुकता आहे.

श्री.दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, मी सन्माननिय सदस्यांना सांगु इच्छितो हा शब्द मुद्याम बोलण्यासाठी मी उभा केला आहे. ज्या दिवशी या नगरिचे आयुक्त मा.महापौरांना उद्येशित करतो  पत्र देतो सभा घेण्याचा अधिकार  तुम्ही ठरविलेला आहे. ही सभा तुम्ही ठरविलेली आहे माझा ऑफिस या विषयावर उत्तर देण्यास बाध्य नाही. ही भाषा कुठपर्यंत योग्य आहे याच्यावर चर्चा व्हावी त्यानंतर मी हेरिंगच्या बाबतीत सांगतो.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, मा.महापौरांसोबत जो पत्राचार मा.आयुक्तांनी केला आहे असा उल्लेख या ठिकाणी दया भैय्यांनी केला या ठिकाणी आपल्या कामकाज नियामावलीमध्ये कामकाज या बाबींचा क्रमामध्ये मा.आयुक्ताकडील पत्र व म्हणजे आयुक्तांचा जो पत्राचार झाला तो आपण पटलावर

ठेवावा तो जर आपण ठेवला तर तुमच्या वाचनामध्ये एखादी गोष्ट आली आणि वाचनाप्रत आपण एखादया निष्कर्षाप्रत पोहचली म्हणजे या सभागृहाचे मत झाले असे होत नाही. मा.महापौरजी मा.आयुक्तांचा मा.महापौर कार्यालयासोबत जो पत्राचार झाला त्या पत्रामध्ये जी भाषा या ठिकाणी बोलल्या गेली त्या संदर्भात जर पटलावर माहिती आली तर मी देखील यावर निश्चितपणाने चर्चा करु शकेल, मा.महापौरजी कामकाज नियमावलीमध्ये आपण पहिल्यांदा प्रश्न उत्तराचा तास घेणे अपेक्षित आहे. प्रश्नोत्तराचा तास झाल्यानंतर जी प्रश्नावली नंतर आपण विषय निहाय चर्चा करु शकतो. म्हणुन मा.महापौरजी माझी आपणांस विनंती आहे की आपण पहिल्यांदा जो पत्राचार आहे त्या पत्राच्या अनुषंगाने आवश्यक जी चर्चा आहे ती निश्चितपणाने या सभागृहामध्ये घेण्याची आमची तयारी आहे. म्हणुन मा.महापौरजी पहिल्यांदा आपण प्रश्नोत्तराचा तास घ्यावा आणि त्यानंतर हा जो पत्राचार झालेला आहे त्यावर स्वतंत्र चर्चा करावी.

श्री.हरीश ग्वालबंशी :- मा.महापौरजी, अभी जब मुहुर्त निकालकर जो सभा ली गयी है अपने यहा जितने जनप्रतिनिधी है अपनी जनता की आवाज को प्रशासन मे पहोचाते है और मा.आयुक्त साहब की जो कार्यप्रणाली है वह अंग्रेजो की जैसी है। आजादी की पहले शहर मे अंग्रेज आये थे और उनके भी फोलोअर्स थे, मा.आयुक्त के भी फोलोअर्स बन गये है शहर मे यह सारी पध्दत लोकशाही के लिये हानीकारक है शहर मे प्रथम नागरिक महापौर होता है और ६ महिने पहले मा.आयुक्त साहब दुसरे जिल्हे से नागपूर शहर मे आये है। उनको नागपूर शहर की भौगोलिक परिस्थिती क्या है यह मालुम नही है। मेरे प्रभाग की जानकारी मै दुंगा

श्री. प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी चर्चा भरकटत चालली आहे.

महापौर :- प्रश्नोत्तराला आपण सुरुवात करुया

श्री.अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, या ठिकाणी साथीच्या रोगामध्ये सभा आयोजित केलेली आहे.त्या संदर्भात काही नियम महानगरपालिकेने निश्चित झालेले आहे त्यामुळे कलम ३१९ चे पार्ट २ चे वाचन करावे.

श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी सुरुवातीला प्रश्नोत्तराचा तास घ्यावा.

महापौर :- कलम ३१९ चे पार्ट २ चे वाचन करावे त्यानंतर आपण प्रश्नोत्तराला सुरुवात करु,

निगम सचिव :- ३१९ चे पार्ट २ (वाचले) आयुक्तांनी जे कोणते उपाय योजले असतील किंवा आदेश दिले असतील ते महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहिजे.

श्री.अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, या ठिकाणी महानगरपालिका या शब्दाचा काय अर्थ आहे. आयुक्त आणि महानगरपालिका या दोन्ही शब्दाचा अर्थ मला समजावुन सांगावे.

निगम सचिव :- महानगरपालिकेची रचना (वाचले) कलम ४९ अन्वये

श्री.अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, महानगरपालिका आणि आयुक्त काय आहे हे निगम सचिवांनी सांगितले ३१९ (२) चे परत मी या ठिकाणी वाचन करतो ज्या वेळेस कुठल्याही साथीच्या रोगाचा प्रार्दुभाव असतो त्यावेळी स्वच्छता विषयक ज्या उपाययोजना आहे. उपाययोजनाच्या संदर्भात कलम ३१९ पोट कलम २ अन्वये आयुक्तांनी जे कोणते उपाय योजले असतील आणि जे कोणते आ देश दिलेअसतील ते महानगरपालिकेला ताबडतोब कळविले पाहिजे. साथीच्या रोगाच्या प्रादुर्भावामध्ये ही सभा सुरु आहे. आणि विषय पत्रिका आहे याच्यामध्ये मला एकही आदेश किंवा आयुक्तांनी घेतलेला निर्णय मला अजुनपर्यत दिसलेला नाही. आणि ज्या रोगामध्ये आपण आज चाललो आहे तिथे आपल्याला चर्चा करायची आहे आणि आयुक्त आपल्याला कळवित नसतील तर याला दोषी कोण आहे याच्यावर कोण कारवाई करणार,

आणि म्हणुन माझी सभागृहाला विनंती आहे हा जो विषय आहे तो अतिशय महत्वाचा आहे ज्या विषयाकरीता आपण या ठिकाणी बसलेलो आहे त्याचा साधा उल्लेख या विषयपत्रिकेमध्ये कुठेही नाही. त्या विषयपत्रिकेमध्ये साधा आदेश देखील नाही. त्यामुळे मा.महापौरजी यावर सभागृहाने निर्णय घ्यावा आपण सुध्दा यावर जो कुठला निर्णय घ्यायचा आहे आपल्या कार्यकाळामध्ये मी तर आपले अभिनंदन करेल मा.महापौरजी या ठिकाणी आपण संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन केले त्यामुळे या ठिकाणी नगरसेवकांना असलेल्या आपल्या अधिकारानूसार काय कारवाई करावी हे देखील संविधानाने लिहुन दिले आहे. हा महानगरपालिकेचा अपमान आहे या सभागृहात बसलेल्या सर्व नगरसेवकांचा अपमान आहे कारण की या सभागृहात बसलेले सर्व नगरसेवक हे या महानगरपालिकेचे विश्वस्त आहे. विश्वासाने या सर्व नगरसेवकांना या ठिकाणी पाठविलेले आहे. या चार ते पाच महिन्याच्या कार्यकाळामध्ये कुठले निर्णय घेतले कुठले आ देश दिले याची साधी माहिती सुध्दा विषयपत्रिकेमध्ये नाही आहे त्यामुळे मी मा.आयुक्तांचा निषेध करतो. येथे घटनेचे उल्लंघन आणि संविधानाचा जर अपमान त्यांनी केलेला आहे आणि सभागृहाने यावर निर्णय घ्यावा असे मी आपल्याला विनंती करतो.

महापौर :- प्रश्नोत्तराच्या तासाला आपण सुरुवात करु आता पावने दोन वाजले आहे. एका तासात जेवढे प्रश्न होतील तेवढे प्रश्न होती आणि बाकी चर्चा पावने तीन पासुन सुरु करु.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, एका तासामध्ये जेवढे प्रश्न होतील तेवढे आपण घेऊ परंतु मागील ३ महिन्यापासून सभा न झाल्यामुळे उर्वरीत प्रश्नांच्या संदर्भात आपण विशेष सभा जर ठेवली तर उर्वरीत प्रश्नावर सुध्दा चर्चा होऊन ते प्रश्न निकाली निघेल.

प्रश्न क्र १९७ :- महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम१९६६ चे कलम ५२, ५३(१), ५४, ५५,५६ अंतर्गत बांधकामाचे नकाशे मंजूर करणे संदर्भात प्रश्न

श्री.हरीश ग्वालबंशी :- मा.महापौरजी, मैने प्रश्न पुछा था की महाराष्ट्र प्रादेशिक नियम व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५३, ५३ (१), ५४,५५,५६ अंतर्गत बांधकाम नकाशे व प्रमाणपत्र देण्याचे काम मनपा मनपा नगररचना विभागाचे आहे काय ? किंवा कसे तसेच या बांधकाम अग्नीशमन विभागाकडुन ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येते काय, मंजूर अनधिकृत बांधकाम केल्यास ते अधिकृत करण्याची कारवाई नगररचना विभागाकडून का होत नाही. याबाबत सविस्तर माहिती सभागृहात देण्यात यावी. मा.महापौरजी इसमे मुझे जो उत्तर मिला है महाराष्ट्र प्रादेशिक नियम व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ अंतर्गत बांधकाम नकाशे मंजूर करण्याची कारवाई तसेच प्लिंथ लेव्हलचे बांधकाम करण्याकरीता ऑक्युपेंन्सी प्रमाणपत्र देण्याचे काम १४.०६.२०१७ रोजीच्या प्रत्यायोजन नुसार नगररचना विभागाकडून होत आहे. करीता आदेशाची प्रत संलग्न. नागपूर शहरात मंजूर विकास नियंत्रण नियमावली व अग्नीशमन विभागाकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन इमारत बांधकाम नकाशा मंजूर प्रत करण्याची कारवाई करण्यात येते. महाराष्ट्र प्रादेशिक नियम व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५३, ५३(१), ५४, ५५,५६ अन्वये अधिकृत बांधकाम बाबतची आवश्यक कारवाई दि.१३.०६.२०१२ रोजीच्या प्रत्यायोजन आदेशाच्या अनुषंगाने क्षेत्रीय कार्यालयाकडून होत आहे. मा.महापौरजी मेरा प्रश्न यह है की जो गलती हुई है उसमे सुधार होना चाहिये, यानी नगररचना विभाग की ओर से जो बिल्डींग प्लॉन जारी किया जाता है उस हिसाब से काम नही हो रहा है ऐसी सूरत मे उनकी गलती को कौन सुधारेगायह काम कोन करेंगा, जो आरक्षित जगह रहती है उसको परिवर्तीत करने का अधिकार किस का है ? मा.आयुक्तका है की सभागृह का है ? मेरे क्षेत्र मे एक शॉपिंग मॉल उसके लिये आरक्षित जगह है उसका आरक्षण चेंज करने का अधिकार आयुक्त को है की महानगरपालिका के सभागृह को है ? इसका उत्तर दिजीये।

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, मला असे म्हणायचे आहे की हे उत्तर दिले कोणी ? या प्रश्नाचे उत्तर उपायुक्त दर्जाचा अधिकारी देतील. मा.सदस्यांचा प्रश्न मा.महापौरांनी पुकारल्या नंतर कोणी अधिकारी उत्तर दयायला तयार नाही. या प्रश्नाचे उत्तर कोण देतील, या महानगरपालिकेची परंपरा होती की आयुक्त सांगायचे पुकारल्या प्रमाणे येथे तर मला आश्चर्य वाटत आहे. या महानगरपालिकेत चालु काय आहे. या प्रश्नाचे उत्तर कोणी दिले. येथे मा.सदस्य श्री.हरीश ग्वालबंशीच प्रश्न वाचत आहे आणि तेच उत्तर उत्तर वाचत आहे येथे काय चालु आहे.

महापौर :- आपण असे ठरविले होते की येथे उपायुक्त दर्जाचे अधिकारी उत्तर देतील.

श्री.दयाशंकर तिवारी :- पॉइंट ऑफ ऑर्डर मा.महापौरजी, मैने इसके पुर्व भी कहा था की सदन मे जो अधिकारी आये है उन्हे सदन की कार्यप्रणाली का नॉलेज नही है इसलिये उनका एक अभ्यास वर्ग होना चाहिये। इस सदन मे जब प्रश्न पुकारा जाता है तो जिस व्यक्तीने उत्तर दिया है वह मा.आयुक्त है, और आयुक्त इस सदन से प्रश्न पुकारने के बाद अपने माईकसे उच्चारीत करते है की वितरीत केल्याप्रमाणे इसप्रकार से प्रश्न की शुरुवात होती है अगर आयुक्त ५ से ६ महिने सभा न होने के कारण यह बात भुल गये है तो कृपया उनको बता दिया जायें अपना कार्य वह ठिक ढंग से करे अपने मुख से कहे की वितरीत केल्याप्रमाणे बाद मे हरीष ग्वालबंशी अपना पक्ष रखे

आयुक्त :- सन्माननिय महापौर, सन्माननिय सभागृह प्रश्नाचे उत्तर लेखी दिलेले आहे. प्रत्येक प्रश्नाला संबधित विभाग प्रमुख प्रत्येक विभागाला दिले आहे त्यांच्यामार्फत उत्तर दिले जाते.

श्री.दयाशंकर तिवारी :- पॉइंट ऑफ ऑर्डर मा.महापौरजी, सभागृहात उत्तर कोणी दिले पाहिजे याच्याबद्दल काय नियम आहे ते सचिवांनी वाचुन दाखवावे.

निगम सचिव :- मा.महापौरजी, प्रत्येक विभाग प्रमुखांनी त्या विभागाचे प्रमुख म्हणुन आपल्या ॲक्टमध्ये तरतुद आहे आणि डेप्युटी कमीश्नरनी त्यामध्ये उत्तर दयावे असे त्यामध्ये नमुद आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, सन्माननिय जेष्ठ सदस्य श्री.दयाशंकर तिवारी आणि दटके साहेबांनी या ठिकाणी जो मुद्या उपस्थित केला त्या अनुषंगाने मी सांगतो की सभागृहाची एक नियमावली आहे आणि सोबत एक परंपरा आहे. जेव्हापासून हा नविन कायदा लागु झाला आणि ही नियमावली तयार झाली तेव्हापासून प्रश्न पुकारल्यानंतर मा.आयुक्त त्यांच्या जागेवरुन उठुन वितरीत केल्याप्रमाणे म्हणेल असे या ठिकाणी सांगतात आणि त्यानंतर जर सदस्याला उपप्रश्न विचारायचे असतील त्या उत्तराने जर समाधान झाले नाही तर उपप्रश्न विचारल्या जाते. शब्दश: त्या नियमावलीमध्ये लिहीले गेले नसेल मात्र ही या सभागृहाची परंपरा राहिली आहे म्हणुन मा.महापौरजी मा.आयुक्तांना आमची विनंती आहे की ही सभागृहाची परंपरा आपण लक्षात घ्या, सभागृहाची परंपरा आपण जाणुन घ्या, त्यामध्ये कुठलाही अट्टाहास किंवा दुराग्रह किंवा कोणाला अपमानित करण्याचा हा सभागृहाचा कुठलाही हेतु नाही मात्र वितरीत केल्याप्रमाणे ही परंपरा सभागृहाची आहे आणि त्या परंपराचे पालन करणे काही चुक नाही. सोबत एक बाब मी आपल्या निर्देशनास आणुन देऊ इच्छितो की मा.आयुक्त महापौरांना संबोधतांना महापौर असे संबोधत आहेत. मा.महापौरजी या ठिकाणी आपल्या कामकाज नियमावलीमध्ये महापौरांना संबोधतांना मा.महापौर संबोधतील व नियम ३५ अन्वये पालिकेचे सदस्या महापौरांना मा.महापौर हे संबोधन करतील की कदाचित त्या संदर्भात त्यांना अवगत नसेल मात्र ती सुधारणा त्यांनी त्यांच्या वक्तव्यामध्ये पुढच्या कार्यकाळात त्यांनी करावी, ही विनंती आपल्या माध्यमातून मा.आयुक्तांना आहे.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, माझी एक आणखी विनंती आहे की मघाशी परिचय करतांना काही अधिका-यांना भान नाही की हे सभागृह आहे. मा.आयुक्तांची किंवा मा.महापौरजी यांनी बैठक नाही.

त्यामुळे या सभागृहात मी जवळपास १५ ते १६ वर्षापासून सदस्य आहे. माझ्यापेक्षा फार सिनिअर सदस्य या सभागृहात असतील परंतु मी जे काही नियम आणि परंपरा वाचल्या आहेत त्यामुळे हे सभागृह फक्त जर भाषण करायचे असतील तर फक्त महापौरांना आणि जर प्रश्न विचारायचे असतील तर ही फक्त महापौरांना करते, त्यामुळे अधिका-यांनी परिचय करुन देतांना जी चुक केली मा.सभागृह, मा.महापौर, आणि मा.आयुक्त या सभागृहाची जी परंपरा आहे जे नियम आहे जे निकष आहे ते मा.महापौरांप्रती आहे. त्यामुळे ज्या संबंधित अधिका-यांनी मघाशी चुक केली ती यानंतर होऊ नये अशी माझी सुचना आहे.

महापौर :- तुम्ही आम्ही आहोत, आज आहो पुढे राहु नाही राहु परंतु सभागृह राहील पण या सभागृहाची जी परंपरा आहे सभागृहाचे जे नियम आहे त्या सर्व नियमांचे आणि परंपरेचे पालन या ठिकाणी सर्व नगरसेवकांनी प्रत्येक अधिका-यांनी करणे अत्यंत गरजेचे आहे ते वारंवार सांगण्याची आवश्यकता पडु नये त्यामुळे आपण जेथुन सुरुवात केली तेथुन प्रारंभ करु.

श्री.हरीश ग्वालबंशी :- मा.महापौरजी, मैने प्रश्न उपस्थित किया है की मेरे प्रभाग मे एक आरक्षण शॉपिंग मॉल के लिये है उसको चेंज करके दुसरी कोई चिज जैसे हॉस्पिटल बनाया जा सकता है क्या ? हो सकता है की महामारी है तो प्लॅन चेंज करने का संपुर्ण अधिकार आयुक्त साहब को हो,आरक्षण चेंज करने का अधिकार सभागृह को है की आयुक्त को है ?

महापौर :- उपायुक्तांनी उत्तर दयावे.

निगम आयुक्त :- सन्माननिय महापौरजी, सन्माननिय सभागृह उत्तर हे वितरीत केल्याप्रमाणे दिलेले आहे. काही विभागाला उपायुक्त नियुक्त नाही त्यामुळे नगररचना विभागाला सहा.संचालक नगररचना आहे काही विभागाला अधिक्षक अभियंता आहे. कंन्सर्न विभागाचे विभाग प्रमुख उत्तर देतील त्यावर जर समाधान होत नसेल तर मी उत्तर देईल.

महापौर :- उपायुक्त नसेल तर त्या विभागाच्या विभागप्रमुखांनी उत्तर दयावे.

सहा.संचालक नगररचना विभाग (श्री.गावंडे) :- मा.महापौरजी, मा.सदन प्रश्नाचे जे उत्तर आहे ते कलम ४४ व ४५ अन्वये नगररचना विभागाकडुन बांधकाम परवानगी विषयक कारवाई होते व कलम ५३,५४,५५,५६ अंतर्गत हे सहा.आयुक्त सबंधित झोन कार्यालयामार्फेत तथापि मंजूर विकास योजनेमध्ये कोणते आरक्षण असल्यास ते आरक्षणाचा फेर बदल करण्यासंबंधीची बाब महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अंतर्गत मा.सभागृहाचा प्रथमत: ठराव पारीत होतो आणि त्या जागेचा आरक्षणाचा वापर बदलाचा असेल तर ३७ ची कारवाई पुर्ण करुन शासनाकडे ती आपण सादर करतो. परंतु येथे विषय इमारतीचा वापर बदलण्यासंदर्भातील प्रश्न असेल तर त्या अनुषंगाने मी पुढे वक्तव्य करतो.

श्री.हरीश ग्वालबंशी :- मा.महापौरजी, मेरे प्रभाग में शॉपिंग मॉल के आरक्षण के संदर्भ मे सभागृह मे विषय नही आया की महानगरपालिका की निधी से दुसरा काम वहा पर चालु हो गया है ? ऐसा होता है क्या ? वहा आरक्षण शॉपिंग मॉल का है। शॉपिंग मॉल का आरक्षण चेंज करने का अधिकार मा.आयुक्त साहब को है क्या ? की सभागृह का है

सहा.संचालक नगररचना विभाग (श्री.गावंडे) :- मा.महापौरजी, इमारतीचा वापर बदलुन घ्यायचा असेल तर इतर प्रयोजनासाठी जर इमारतीचा वापर करायचा असेल तर ३७ ची प्रक्रीया राबविणे आवश्यक आहे.

श्री.हरीश ग्वालबंशी :- मा.महापौरजी, आरक्षण चेंज करने का अधिकार किसको है ?

सहा.संचालक नगररचना विभाग (श्री.गावंडे) :- मा.महापौरजी, विभागाकडुनच कलम ३७ च्या कारवाईचा ठराव होतो त्यानंतर ती कलम ३७ अन्वये कारवाई पुर्ण केल्यानंतर शासनाला आपण ठराव

पाठवितो शासनाकडुन मंजूरी प्राप्त झाल्यानंतरच इमारतीचा वापर करतो.

महापौर :- सदस्यांच्या क्षेत्रात शॉपिंग मॉलचा आरक्षण बदलण्याची माहिती आपल्याला आहे काय? सहा आयुक्तांना माहिती आहे काय ?

श्री.हरीश ग्वालबंशी :- मा.महापौरजी, या संदर्भात आयुक्त साहेबांना माहिती आहे. के.टी. नगर रत्न सृष्टीची ती इमारत आहे.

सहा.संचालक नगररचना विभाग (श्री.गावंडे) :- मा.महापौरजी, के.टी. नगर येथील तेथे शॉपिंग मॉलचे आरक्षण होते त्या ठिकाणी अकोमोडेशन रिझर्वेशन म्हणजे सर्व समावेशक आरक्षणा अंतर्गत त्या जागेचा आपण विकास केला. त्या अंतर्गत् जमिन मालक आपल्याला २५ टक्के शॉपिंग कॉम्पलेक्स बांधुन देतात.

श्री.हरीश ग्वालबंशी :- मा.महापौरजी आप नियम मत बताओं आरक्षण चेंज किया है और वहा पर काम हो रहौ है l मै यह पुछ रहा हु की वहापर आरक्षण था वह आरक्षण चेंज करके काम कर रहे है उसकी अनुमती आपने सभागृह से  ली क्या ? और सभागृह से नही ली तो आरक्षण हटाने का अधिकार आपको है क्या ? यह मेरा प्रश्न है l

सहा.संचालक नगररचना विभाग (श्री.गावंडे) :- मा.महापौरजी, आरक्षणाच्या जागेवर बांधलेल्या इमारतीचा वापरामध्ये बदल करण्यासंदर्भात प्रोसेस करावा लागतो परंतु कोणत्या प्रयोजनासाठी करतात हा महत्वाचा विषय आहे.

श्री.विक्रम ग्वालबंशी :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन आपण ३७ ची कारवाई केली का आधी.

सहा.संचालक नगररचना विभाग (श्री.गावंडे) :- मा.महापौरजी, ३७ ची कारवाई केलेली नाही.

श्री.विक्रम ग्वालबंशी :- मा.महापौरजी, मग अशा प्रकारे तेथे जर बदल होत असेल तर ते बेकायदेशीर होईल.

श्री.हरीश ग्वालबंशी :- मा.महापौरजी,जो वापर  चेंज किया गया है वह कायदेशीर है की बेकायदेशीर है l

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, या ठिकाणी प्रश्न विचारत आहे आपण सरसकट आरक्षण बदलले आहे की रिझर्वेशन आरक्षण अकोमोडेशन स्कीम अंतर्गत् केले आहे.

सहा.संचालक नगररचना विभाग (श्री.गावंडे) :- मा.महापौरजी, अकोमोडेशन स्कीम अंतर्गत बांधकाम केलेले आहे. महानगरपालिकेच्या ते ताब्यात आहे. शॉपिंग सेंटर म्हणुन ते विकसीत करुन आपल्या ताब्यात ते घेतलेले आहे. परंतु आता त्या जागेवर शॉपिंग सेंटरच्या ऐवजी हॉस्पीटल

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, म्हणजे तेथे शॉपिंग सेंटरचे आरक्षण असतांना तेथे बांधकाम हॉस्पीटलचे झालेले आहे.

सहा.संचालक नगररचना विभाग (श्री.गावंडे) :- मा.महापौरजी, हॉस्पीटल झालेले नाही आहे. वापर बदलला आहे.

श्री.हरीश ग्वालबंशी :- मा.महापौरजी, यहा पर गलत माहिती दी जा रही है, मै वहा का नगरसेवक हु मुझे मालुम है l

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, अशी परमीशन खाजगी क्षेत्रात पण मिळणार आहे काय ?

सहा.संचालक नगररचना विभाग (श्री.गावंडे) :- मा.महापौरजी, नाही.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, जर खाजगी क्षेत्रात मिळत नसेल तर त्यांचे म्हणणे खरे आहे. तेथे ऐवढे मोठे आंदोलन झाले तरी देखील मंचावरुन अधिकारी खोटे बोलत आहे.

श्री.हरीश ग्वालबंशी :- मा.महापौरजी इस विषय को लेकर मै मा.आयुक्त साहब के पास गया, मैने बोला

की मै जनता का प्रतिनिधी हु जनता की भावना प्रशासन तक पोहचाना यह मेरी जिम्मेदारी है, मैने बोला साहब आप स्पॉटपर चलो, वहा के लोगों को पुछो तो आयुक्त साहब बोले की वहा के लोगों को मेरे ऑफीस मे लेकर के आवों. कलम १४४ रहते हुये पाच लोगों को एकट्ठा नही कर सकते तो वहा के स्थानिय लोगों को मा.आयुक्त साहब के कॅबिन मे कैसे ले जा सकते है मैने बोला आप प्रशासकीय अधिकारी हो और मे जनता का चुना हुआ नुमाईंदा हु, जनता की भावना तुम्हारे पास पहोचाना मेरा कर्तव्य है, और उसका मान रखना तुम्हारा काम है l नागपूर शहर मे जब कोई कोरोना का पेशंट होता है तो नागपूर शहर के पेशंट का ईलाज नागपूर मे ही होंगा, उसको पुना और मुंबई भेजेंगे नही, लेकीन वहा के जनप्रतिनिधी से वहा के स्थानिक रहीवासी को तकलीफ न हो जितने भी नागपूर महानगरपालिका के सदस्य है उनकी राय लेकर के उनको विश्वास मे लेकर अगर कोव्हीड का हॉस्पीटल बनाया जाता तो अच्छा होता मेरे घर के पास मे अगर कोव्हीड का हॉस्पीटल होंगा तो उसका ईलाज तो मेरे ऐरियामे ही होगा ना हम नगरसेवक है हमको वहा की भौगोलिक स्थिती मालुम है हम सुझाव देसकते है, आप अभी ५ से ६ महिने हो गये नागपूर शहर मे आये है लगता है दो या तिन महिने मे चले भी जायें जो इनकी कार्यपध्दत है उसके हिसाब से अंग्रेजो के भी फॉलोअर्स थे, मा.आयुक्त साहब सोशल मिडीयामे छाये रहते है, मुह मे मास्क नही सोशल मिडायामे यह चलता है २०० लोगों को संबोधित करते है जब यह मानते नही जब जनता के हित के लिये सभागृह लेने का समय आता है तो जबाबदारी झटक देते है इनकों मालुम है की अब जवाब देना पडेंगा l यहा जो सदस्य है वह जनता का घुस्सा लेकर सदन मे आते है, मेरे ऐरिया की समस्या लेकर के मै सदन मे आता हु अगर महापौर की तरफ से उसका समाधान नही होता तो मै आयुक्त साहब के पास जाऊंगा l नागपूर महानगरपालिका के आयुक्त साहब लोकशाही पध्दत को पंगु करने के पिछे पडे है, पुरे रुप से खतम करने के पिछे पडे है पहले विदेश से अंग्रेज आते थे उन्होने बोले की यहापर यह बनाना है आजादी के पहले जबसे देश आजाद हुवा मैने संविधान के अनुरुप प्रश्न उपस्थित किया है मेरे क्षेत्र मे जो दवाखाना बनाया गया है उसका आरक्षण कैसे परिवर्तीत किया गया है ?

सहा.संचालक नगररचना विभाग (श्री.गावंडे) :- मा.महापौरजी, आरक्षण चेंज केलेले नाही.

महापौर :- वापर चेंज केला आहे काय ?

सहा.संचालक नगररचना विभाग (श्री.गावंडे) :- मा.महापौरजी,ते मार्केटसाठी बांधलेले आहे आणि ते महानगरपालिकेच्या ताब्यात आहे.

निगम आयुक्त :- सन्माननिय महापौरजी, सन्माननिय सभागृह आता जो प्रश्न चालु आहे तो के.टी. नगर हॉस्पीटलच्या संदर्भातील चालु आहे. त्या अनुषंगाने आपली ऑलरेडी तेथे पी.एस.सी. आहे आणि पी.एस.सी. च्या बाजुला तेथे आपली बिल्डींग उभी आहे त्या ठिकाणी कमीर्शीअल अॅक्टीव्हीटी होतात तेथे आपण कोव्हीड -१९ चे डेडीकेटेड कोव्हीड सेंटर बनविले आहे. कारण तेथे ऑलरेडी पी.एस.सी. आहे.

श्री.दयाशंकर तिवारी :- पाईंट ऑफ इंफॉर्मेशन, मा.महापौरजी, आमच्या अधिकारावर निगम आयुक्त आपला चाबुक चालवु शकत नाही, मला बोलु घा त्यानंतर तुम्ही बोला, सभागृहाचे संचालन मा.महापौरजी आपण करतात निगम आयुक्त करीत नाही. पाईंट ऑफ इफार्मेशन म्हणजे काय ? मी विचारल्यावर आयुक्त उत्तर देणार काय ?

महापौर :- पाईंट ऑफ इंफॉर्मेशन म्हणजे मा.सदस्यांचा अधिकार आहे.

श्री दयाशंकर तिवारी :- सभागृह नियमाप्रमाणे चालेल निगम आयुक्त सांगु शकत नाही कि कसे चालेल. मा.महापौरजी, जेथे पी.एच.सी. सुरु आहे, तेथे काय आरक्षण आहे.

महापौर :- आयुक्तांचे असे म्हणणे आहे कि, असे जर सुरु राहिल्यास मी सभागृहात राहणार नाही.

श्री दयाशंकर तिवारी :- पाईंट ऑफ आर्डर, मा.महापौरजी, जर आयुक्त सभागृहात उत्तर देत असतील व आयुक्तांच्या उत्तरामध्ये चुक असेल तर आयुक्तांच्या उत्तरामध्ये जी चुक आहे ती सुधारण्याचे अधिकार या सभागृहानी निर्वाचित प्रतिनिधींना दिलेले आहे त्याच्यावर जर आयुक्त असे म्हणतील कि मी बोलेल तोपर्यंत माझ्या मधात बोलायचे नाही, हे काय सुरु आहे याच्यावर आपण आपले भाष्य करावे. हे आमचे अधिकार आहे किंवा नाही आहे.

महापौर :- १०० टक्के मा.सदस्यांचे अधिकार आहे आणि मी आयुक्तांना तेच सांगत आहे. पाईंट ऑफ इंफॉर्मेशन घेण्याचा अधिकार सदस्यांना आहे आणि त्यांचे झाल्यावर आयुक्तांनी त्याच्यावर भाष्य करावे. पाईंट ऑफ इंफार्मेशनचा जो प्रश्न दयाशंकर तिवारी यांनी विचारलेला आहे, त्याचे उत्तर प्रशासनानी दयावे.

श्री दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, माझा पाईट ऑफ इंफॉर्मेशन हे आहे, मा.आयुक्त महोदय आपल्या उदबोधनामध्ये म्हणाले कि, तेथे पी.एच.सी. सुरु होती, ज्याठिकाणी पी.एच.सी. सुरु आहे त्या ठिकाणचे आरक्षण काय आहे. त्याची माहिती सभागृहासमोर सांगण्यात यावी.

सहा.संचालक नगररचना विभाग (श्री.गावंडे) :- मा.महापौरजी, ज्याठिकाणी पी.एस.सी. आधी सुरु होती त्याच ठिकाणी पीएससी सुरु आहे, त्याच्या बाजुला जी इमारत आहे त्या इमारतीमध्ये मार्केटसाठी आरक्षण आहे.

श्री दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, मला जे उत्तर अपेक्षित होते ते मिळाले, मा.आयुक्त गोंधळ करीत आहे. तेथे पी.एच.सी सुरु होती म्हणुन मी तेथे हास्पिटल सुरु केले, आणि पी.एच.सी. चे आरक्षण वेगळे आहे, पी.एस.सी. ची बिल्डींग वेगळी आहे मधात येण्या-जाण्याचा रस्ता आहे. त्याच्यात कॉलनीमध्ये जाण्याचा दरवाजा आहे, ऑकोमोडेशन स्कीममध्ये आपण त्याला लागुन मार्केट बांधण्याचा निर्णय घेतलेला आहे. आणि मार्केटचे आरक्षण न बदलता आपण त्याठिकाणी हॉस्पिटल चालवित आहे, असे मा.सदस्यांचे म्हणणे आहे. मा.महापौरजी, जर सभागृहात चुकिची बाब आयुक्त करीत असतील व चुकिची माहिती देत असतील व खोटे बोलत असतील त्याच्यासाठी आम्ही पाईंट ऑफ इंफार्मेशन घेत असेल व त्यांना त्याचे वाईट वाटत असेल तर त्यांनी मा.मुख्यमंत्रीना सांगुन ताबडतोब नागपूर सोडुन चालले जावयास पाहिजे.नाही तर नियमाप्रमाणे चालावे.

श्री हरीश ग्वालबंशी :- मा.महापौरजी, मा.आयुक्त ने यहां जिस तरीके से बताया उससे ऐसा लगता है कि मा.आयुक्त शहर के हितैशी नही है, वह हुकुमशाही को मानने वाले है. जैसे तुकाराम महाराज थे, वैसे निगम आयुक्त नही है वह तुकाराम महाराज के नामपर कलंक है।

( निगम आयुक्त सभेतून निघून गेले)

महापौर :- या पध्दतीने आपल्याला सदन चालवावयाचे नाही, ती मा.आयुक्तांची भुमिका होती ती त्यांनी मांडली आपण आपली भूमिका मांडु.

श्री दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, माझी आपणांस विनंती आहे कि, जेथून आपण हया प्रश्नावर चर्चा सुरु केली होती, मा.आयुक्त ज्या प्रश्नाचे उत्तर देत होते. तेथुन सुरुवात करावी, आता आयुक्तांच्या जागेवर बसलेले श्री राम जोशी साहेबांना प्रश्नाचे उत्तर विचारावे, हा ही संयोग आहे कि दोन दोन जोशी सभागृहात आहे.

श्री हरीश ग्वालबंशी :- मा.महापौरजी, आज जो बर्ताव मा.आयुक्त करके गये, इसके ऊपर कोणती कार्यवाही की जायेगी, उसकी हमे जानकारी दिजीये.

महापौर :- निगम सचिव यांनी या विषयावर माहिती द्यावी.

निगम सचिव -: मा.महापौरजी, असे पहिल्यांदाच सभागृहात झाले आहे.

महापौर :- विधी अधिकारी सभागृहात उपस्थित आहे त्यांनी याबाबत उत्तर द्यावे.

श्री प्रफुल गुडधे :-मा.महापौरजी, मा.सदस्य, श्री हरीश ग्वालबंसी यांचा प्रश्न सुरु होता. सभागृहाचे कामकाज सभागृहाच्या नियमावलीप्रमाणे चालते, चालले पाहिजे, संघर्षाची भुमिका आमची राहिलेली नाही. सभागृह नियमानी चालते साथ ही साथ परंपरेनी चालते. सभागृहाच्या या परंपरा कायआहे, सभागृहाच्या परंपरेच्या अनुरुप काम करतांना माणसांच्या हातातुन चुका निश्चितपणाने होवु शकतात, जेव्हा मी पहिल्यांदा या सभागृहात आलो होतो, त्यावेळेस सभागृहाची आम्हाला माहिती नव्हती. मग हळुहळु त्यावेळच्या ज्येष्ठ सदस्यांकडुन आम्ही हया परंपरा शिकवुन घेतल्या. लोकशाहीमध्ये सभागृह हे सर्वोच्च आहे. आणि सभागृहामध्ये आम्हाला चर्चा करावयाची आहे आणि सभागृहाच्या चर्चेची उंची कुठपर्यंत न्यायची ही सर्वस्वी सभागृहाच्या सदस्यांची जबाबदारी आहे. सोबत सोबत प्रशासनाची ही जबाबदारी आहे कारण या सभागृहामध्ये चर्चा करीत असतांना विविध भागातुन लोक निवडुन येत असतात, विविध पार्श्वभुमीतुन लोक निवडुन येत असतात. त्यांची शैक्षणिक पार्श्वभुमी निश्चिपणाने वेगवेगळी राहु शकते. एखाद्याच्या प्रश्न मांडण्याच्या पध्दतीमध्ये फरक राहु शकतो. मात्र मा.महापौरजी, त्याच्या हेतु जो आहे तो सर्वस्वी लोकांच्या बाजुने लोकांच्या दिशेने असतो, त्याकरिता हया सर्व गोष्टी मांडणे अभिप्रेत असते. मा.महापौरजी, मी सकाळपासून बॉयलाज पाहत होतो कारण असे प्रसंग सभागृहामध्ये येवु शकतात काय ? मा.महापौरजी, निश्चितपणाने असे प्रसंग येवु शकतात. त्याची कल्पना आम्ही तेव्हाही केली, नियमावली बनवितांना, वादविवाद सभागृहामध्ये होवु शकतात काय ? निश्चितपणाने वादविवाद होवु शकतात. विविध मते या सभागृहामध्ये वेगवेगळया लोकांच्या राहु शकतात काय ? ते निश्चितपणाने वेगवेगळे मत राहु शकतात सत्तापक्षाच्या नगरसेवकांचा एक वेगळा मत राहु शकते तर विरोधी पक्षाच्या नगरसेवकांचा एक वेगळा मत राहु शकते. आमचा तर त्याच्याही पेक्षा आमच्या याच्यात दोन वेगवेगळे मत राहतात. आमच्यामध्ये त्याचे काही वाईट मानत नाही, कारण कि लोकशाही आहे, लोकशाहीमध्ये दोन वेगवेगळे मतप्रवाह असते. मा.महापौरजी, सभागृहामध्ये कामकाज करीत असतांना व्यक्तिगत टिप्पणी करणे योग्य नाही. मात्र त्याच्या मागचा हेतु काय आहे हे पण समजुन घेण्याची आवश्यकता आहे.मा.महापौरजी,आज जो प्रसंग घडला तो सभागृहानी पहिल्यांदा अनुभवला आहे,ही निश्चितपणाने दुर्देव्यी घटना आहे,मा.महापौरजी,माझी विनंती आहे, मा.आयुक्तांना सुध्दा विनंती आहे. याठिकाणी दया भैयानी आपला मुद्या उपस्थित केला तो सभासदांचा अधिकार आहे, पाईंट ऑफ आर्डर घेण्याचा पाईंटऑफ इंफार्मेशन घेण्याचा जसे आपण सोबतच्या नगरसेवकांच्या मुद्यावर आक्षेप घेतो, तसेच प्रशासनाच्या मुद्यावर देखील आक्षेप घेण्याचा अधिकार निश्चितपणाने या सदनाच्या सभासदाना आहे. याच्यामध्ये वाईट वाटुन घेण्याचे कुठलाही कारण नाही. आता तो आक्षेप मान्य करायचा कि नाही मान्य करायचा.मा.महापौरजी याच्यामध्ये लिहिलेला आहे,ते सर्वस्वी अधिकार मा.महापौरांना आहे.मा.महापौरजी, तसे कायद्यामध्ये सांगीतले आहे कि माननीय लिहिण्याची काही प्रथा नाही. तरी ती परंपरा आहे आपण ती स्विकारलेली आहे सभागृहानी ती स्विकारलेली आहे. आपली एक सामाजिक सभ्यता आहे येथे आयुक्तांना सुध्दा माननीय संबोधण्याची आवश्यकता नाही. तरी आपण आयुक्तांना मा.आयुक्त असे संबोधतो. त्याच्या मागचा हेतु त्याच्या मागचे कारण या सभागृहाच्या परंपरा राहिलेल्या आहेत.अनेकदा नियम चाळत असतांना नियमामध्ये वेगळे असते व सभागृहाच्या कामकाजामध्ये वेगळे असते. निश्चितपणाने आज जे घडले तसे नाही घडले पाहिजे. एखाद्या विषयावर सांगोपांग चर्चा होवु शकते, वादविवाद होवु शकते. तरी या वादविवादा अंती लोकशाहीला अभिप्रेत असलेल्या लोकशाहीला पुरक असलेले वातावरण निश्चितपणाने निर्माण केले

पाहिजे. मा.महापौरजी, मागे आपण सर्व पक्षीय सभा घेतली होती, त्यात आपण सर्व होतो, हा जो संघर्ष सुरु आहे, मा.आयुक्त, प्रशासन व पदाधिका-यामध्ये संघर्ष आहे, कशाचे संघंर्ष आहे, कशाचे भांडण आहे, काही इस्टेटीचे भांडण आहे काय ? काही सात बाराचे भांडण आहे काय ? जो लोकशाहीमध्ये प्रदत्त अधिकार सदस्यांना आहे, तसेच अधिकार आयुक्तांना आहे, आयुक्त या सभागृहाला आनसरेबल आहे. त्यांना उत्तर द्यावे लागेल मात्र ते देत असतांना प्रत्येक गोष्ट आपल्या मनासारखी व्हावी, असे मानण्याचे काही कारण नाही, आम्ही येथे राजकारणामध्ये आहो, १७-१८ वर्षापासून या सदनाचे सदस्य असतांना अनेक आमच्या मनाच्या विरोधात निर्णय झाले. त्यावर आम्हाला निश्चितपणे सभात्याग करण्याचा अधिकार आहे, निषेध नोंदविण्याचे अधिकार आहे, आपले मत पटलावर नोंदविण्याचे सुध्दा अधिकार आहे. मा.आयुक्तांना या संदर्भामध्ये काही वेगळे वाटत अेसल तर त्यांनी आपली नाराजी निश्चिपणाने या सभागृहामध्ये नोंदवावी. मात्र असे सभागृह सोडुन जाणे योग्य होणार नाही. ही बाब शहराच्या दृष्टीने सुध्दा योग्य होणार नाही, मी एक बैठकीमध्ये सुध्दा सांगीतले होते कि, या संघर्षामध्ये कोणाचा फायदा नाही, कोणाचाच फायदा नाही, आयुक्तांचे नुकसान होणार नाही, आमचे ही काहीच नुकसार होणार नाही. परंतु निश्चिपणाने या शहराचे नुकसान होईल. त्यामुळे आपण यात समन्वय निर्माण केले पाहिजे. प्रशासनानी सुध्दा भुमिका घेतांना अट्टाहास न करता लोकप्रतिनिधी आहे त्याचे जे अधिकार आहे, त्यांची मांडण्याची पध्दत कमी अधिक राहु शकते, माझी व दटके साहेबांची अनेक सभेमध्ये वादावादी झालेली आहे. मी आपला मत त्यांच्यावर थोपवु शकत नाही, त्याचप्रमाणे ते सुध्दा आपला मत माझयावर थोपवु शकत नाही. मला असे वाटते कि लोकशाही मध्ये ही परंपरा राहिलेली आहे. हा प्रसंग दुर्देवी आहे. आपण पुन्हा एकदा आयुक्तांना या सभागृहाच्या परंपरेच्या संदर्भात अवगत करुन द्यावे, मला असे वाटते कि त्यांना राग आला असेल तर तो राग मनावर घेण्याचे काहीच कारण नाही. सुरुवातीला मा.महापौरजीला मा.महापौरजी म्हणुन न संबोधित करण्याच्या संदर्भातील मी परंपरा सांगीतली आहे कोणाला उपमर्द करणे किंवा कोणाला अपमानित करणे हा त्या मागचा हेतु नाही. कि आम्हाला मुद्यामपणे आयुक्तांची चुक निदर्शनास आणुन द्यावयाची आहे असे ही नाही. मात्र वातावरण हेल्दी असले पाहिजे, जर वातावरण हेल्दी नसेल तर अश्या सभा, अश्या चर्चा वायफळ जाणार नाही, त्यावर वाद निर्माण होणार नाही. माझी आयुक्तांना विनंती आहे कि आपण असा वाईट निर्णय लोकशाहीला विरोध करणारा घेवु नका, आपण या सभागृहाची या शहराची परंपरा समजुन घ्या, येथील चर्चेचा स्तर विधी मंडळाच्या चर्चेच्या स्तराच्या बरोबरीचा आहे. आता आमचे मित्र श्री प्रविणजी दटके विधी मंडळात गेलेले आहे. त्यांना लक्षात येईल की इथल्या चर्चेचा स्तर विधीमंडळाच्या चर्चेच्या स्तरेच्या बरोबरचा आहे. निश्चितपणाने हेल्दी चर्चा या सभागृहामध्ये अनेक विषयावर झालेली आहे. होतील, तुकाराम या नावाचा मा.सदस्यांनी उल्लेख केला त्यामुळे होवु शकते मा.आयुक्तांना थोडा बहोत राग आला असेल. ठिक आहे व्यक्तिगत टिका टिप्पणी आपण टाळली पाहिजे. जी काही आपली नाराजी आहे ते चेअरच्या प्रति नाराजी आहे, व्यक्तीच्या प्रति नाराजी नाही. व्यक्तिच्या प्रति नाराजी असण्याचे काही कारण नाही, आमची पण नाराजी आहे पण ती त्या चेअरच्या प्रति आहे. अनेक अधिका-यासोबत आमची नोकझोंक झालेली आहे. नोकझोक म्हणजे डिबेट झाली, वादविवाद झाले, येथे एक पर्टीकुलर शब्द आहे वादविवाद होवु शकते. अश्या वादविवादाच्या प्रसंगी संयमाची व थोडीशी प्रगल्भ भुमिका आपण घेतली पाहिजे. मा.महापौरजी, मी आपल्या वतीने विनंती करतो कि, मा.आयुक्तांनी तसा राग मनात न ठेवता, त्यांनी या सभागृहामध्ये निश्चितपणाने सहभागी व्हावे, आणि हया सभागृहामध्ये लोकशाहीच्या दृष्टीकोणातुन आवश्यक बाबी सांगण्यास आम्ही पण तयार आहोत, आपण ही सांगावी. संघर्ष करण्याची आमची तयारी नाही, पण आपण जर अट्टाहास करणार असाल तर मला असे

वाटते कि लोकशाहीच्या दृष्टीकोणातुन हे बरोबर नाही. साधकबाधक चर्चा या सभागृहात झाली पाहिजे. मा.महापौरजी, आपण मा.आयुक्तांना विनंती केली पाहिजे कि, आपण पुन्हा सभागृहात या, असा कोणाचा ही व्यक्तिगत मानस नव्हता, मा.सदस्यांच्या बोलण्यातुन हे होवुन गेले असेल तर ते चेअरच्या संदर्भात होते, म्हणुन माझी विनंती आहे कि आपण सभागृहाच्या वतीने मा.आयुक्तांना विनंती करावी, सभागृहात येण्यासाठी

श्री हरीश ग्वालबंशी :- मा.महापौरजी, जब दयाभैया बोल रहे थे तब ही मा.आयुक्त निकल गये, उनको मालुम हो गया था आज वह जवाब नही दे पायेगे. इसलिये उन्होने निकलने की तैयारी करली.

श्री प्रविण दटके :- मा.महापौरजी, मा.प्रफुल गुडधे बोलले, मा.दयाशंकर बोलले, वारंवार आपण ही आपली भुमिका समन्वय साधा, समन्वय साधा, टोकाची भुमिका घेवु नका, असे वारंवार वारंवार बैठका घेवून बोलत असतो. प्रेस असेल आपण हे सांगीतले आहे. आता ही लोकशाही आहे, एखाद्या विषयाला प्रविण दटकेचा विरोध राहु शकतो, एखाद्या व्यक्तिचा एरीआ व स्वभाव वेगळा राहतो, यामुळे कोणाची ही बोलण्याची पध्दत वेगळी राहु शकते. त्यामुळे एखाद्या वेळेस त्यांच्या मनात नसेल व त्यांनी तो मुद्या उचलला असेल व त्यामुळे ते नाराज झाले असतील तर मी आपणांस विनंती करतो कि आपण हे सभागृह १० मिनिटाकरिता स्थगित करावे, मा.अति.आयुक्त येथे बसलेले आहे त्यांच्या माध्यमातुन निगम आयुक्तांना निरोप द्यावा, त्यांनी परत सभागृहात यावे, व परत आपण सभा सुरु करावी, अशी आपणांस विनंती आहे.

महापौर :- या प्रश्नाचे उत्तर आपण देऊन दयावे त्यानंतर आपण सभा स्थगित करु, आणि वेळ पडल्यास मी देखील सन्माननिय आयुक्तांशी चर्चा करेल, परंतु हे होणे लोकशाहीसाठी घातक आहे. दुर्देव्यानी हे झालेले आहे. मला असे वाटते की या संपुर्ण महानगरपालिकेच्या इतिहासामध्ये अशी घटना पहिल्यांदा घडलेली आहे, श्री हरीश ग्वालबंशीच्या प्रश्नाच्या संदर्भात उत्तर दयावे त्यानंतर आपण सभा १० ते १५ मिनीटाकरीता स्थिगीत करु, (बेल) सन्माननिय सदस्य हरीशजी ग्वालबंशी आपकी और मेरी सभी की एक ही भावना है की सभागृह अच्छे तरीकेसे चलना चाहियें, लोकशाही का खुन नही होना चाहियें और इसिलये सबको साथ मे लेकर चलना है।

श्री.हरीश ग्वालबंशी :- मा.महापौरजी, ऐसा कृत्य मा.आयुक्तजी ने किया है तो सभागृह उनके उपर कौनसी कारवाई करेंगा।

महापौर :- सभागृह खतम होने के पहले हम उसके उपर निर्णय लेंगे परंतु आता प्रश्नाच्या संदर्भात उत्तर दयावे. त्यांनी जे सांगीतले आहे, त्या इमारतीच्या संदर्भात जो ठरलेला वापर आहे तो होत नाही, आता त्याच्यानंतर काय? हे जर केल्या जात नसेल तर त्याची जबाबदारी कोणाची आहे. बिना वापर बदलता हा विषय झालेला आहे, किती दिवस झाले त्या ठिकाणी काम सुरु केले व महानगरपालिकेचे पैसा देखील वेस्ट झालेले आहे.

वैद्यकीय अधिकारी (श्री.सवाई) :-मा.महापौरजी, के.टी.नगर येथे ऑक्सीजन लाईनिंगचे काम चालु आहे त्याठिकाणी बांधकाम विभागाकडुन काम सुरु आहे. अद्यापही ते आरोग्य विभागाला हस्तांतरीत करण्यात आले नाही.

श्री दयाशंकर तिवारी :- पाईंट ऑफ इंफार्मेशन, मा.महापौरजी, जे बांधकाम सुरु होते, त्याचे टेंडर झाले आहे काय ? टेंडर कोणत्या कामाचे झाले आहे. एखाद्या नगरसेवक जेव्हा पत्र देते काम करण्यासाठी तेव्हा त्या जागेचा आरक्षण काय आहे, त्याचे मालक कोण आहे, असे प्रश्न विचारण्यात येते. नंतर फाईल बनते, समजा त्या जागेवर आरक्षण असेल तर ते काम नाकारण्यात येते. हया सर्व बाबी आयुक्तांनी फाईलमध्ये

पाहिल्या नाहीत काय ?

अधिक्षक अभियंता (श्री तालेवार) :- मा.महापौरजी, केटी नगरमध्ये जी इमारत आहे, त्या इमारतीमध्ये आपण बदल केलेला नाही, फक्त आपण त्याठिकाणी हॉस्पिलचे सेंटर तयार करण्यासाठी काम हाती घेतले आहे.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, मा.दया भैयानी विचारले कि एखाद्या ठिकाणी बगिचा करावयाचा आहे पण तेथे आरक्षण प्ले ग्राउंडचा आहे, मग ती फाईल तयार करतांना त्याचे मालक कोण, त्याचा सात बारा झालेला आहे काय ? सिटी सर्व्हेमध्ये काय आहे. हया सर्व कागदपत्र आपण मागतो, मागतो कि, नाही,

अधिक्षक अभियंता (श्री तालेवार) :- मा.महापौरजी, ती इमारत महानगरपालिकेची आहे, तेथे कर्मशियल कॉम्पलेस निर्माण करण्यांत येणार आहे.

श्री प्रविण दटके :- मा.महापौरजी, कमर्शीअल कॉम्प्लेक्समध्ये आपण हॉस्पिटल बनविण्याची परवानगी देतो काय ? व आपण हाच नियम खाजगी क्षेत्राकरिता लावणार आहेत काय ? एखादा नगरसेवक समाजभवन बांधायला लावला तर हा जी.आर आहे तो जी.आर आहे. एन.आय.टी. ची परवानगी, नझुलची परवानगी मागतो, तर आपण येथे मागितली काय ?

श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी, या ठिकाणी आपण या कामाच्या निविदा काढल्या होत्या काय? किती निविदाकार आले होते.

अधिक्षक अभियंता (श्री तालेवार) :- मा.महापौरजी, होय निविदा काढल्या होत्या.

श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी, किती निविदाकार आले होते.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, निविदा काढायच्या आधी त्याचे आरक्षण तुम्ही तपासले होते काय ?

अधिक्षक अभियंता (श्री तालेवार) :- मा.महापौरजी, त्या ठिकाणी कर्मशियल कॉम्पलेक्सचे आरक्षण होते. या ठिकाणी कोव्हीड आल्यानंतर एस.आर.ए. इमारतीत दवाखाना निर्माण करण्याच्या कामाचे टेंडर काढलेले होते.

श्री प्रविण दटके :- मा.महापौरजी, त्या ठिकाणी दवाखान्याचे आरक्षण आहे काय? जर त्या ठिकाणी आरक्षण नसेल तर असे टेंडर काढता येते काय? उद्या सभागृहातील एका मा.सदस्यांनी जर म्हटले की हे रिकामे ग्राऊंड आहे त्या ठिकाणी बगिचा करावयाचा आहे तर तुम्ही काय विचारणार, प्ले ग्राउंड आहे की ओपन स्पेस आहे, पी.यु. लॅन्ड आहे का मग एन.आय.टी. ची लॅन्ड आहे, की एन.आय.टी. ची लॅन्ड आहे. मग त्याची एनओसी आहे काय ? असे आपण त्यांना विचारले काय ? हो किंवा नाही.

अधिक्षक अभियंता (श्री तालेवार) :- मा.महापौरजी, प्रस्ताव आपण एडीटीपीला पाठविला नव्हता.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, का नाही पाठविला मग, इतर सामान्य नगरसेवकांचे प्रस्ताव जाते तर हा प्रस्ताव का नाही पाठविला, ही काही विशेष बाब आहे काय? प्रस्ताव का नाही पाठविला.

अधिक्षक अभियंता (श्री तालेवार) :- मा.महापौरजी, तसा प्रस्ताव पाठविला नव्हता.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, सामान्य नगरसेवकाचा तसा प्रस्ताव पाठवितो काय ? की.एन.आय.टी. ची एन.ओ.सी. आण, नझुलची एन.ओ.सी. आण, ही जमिन कोणाच्या मालकीची आहे असे विचारतो का आपण बाकी प्रश्नामध्ये, आपण विचारतो. याचे कारण सांगतो मा.माजी उपमहापौर बसले आहेत सभागृहात त्यांचा एक ई लायब्ररीचा प्रस्ताव होता तेथे जी स्लम आहे नाईक तलाव, बांग्लादेश, तांडापेठ येथील सर्व विद्यर्थ्यांना एक अभ्यासिका मिळावी आणि तेथे अभ्यासिकेचे निर्माण व्हावे, तेथे बाजाराचे आरक्षण होते. हा विषय बरोबर आहे की नाही. मा.महापौरजी, माझी विनंती आहे ज्यांनी ज्यांनी ही फाईल बनविली टी.ए. डेप्टी, एक्झीकेटीव्ह, ए.सी. आणि सी.ई पण असतील हा प्रस्ताव

कितीचा आहे.

अधिक्षक अभियंता (श्री तालेवार) :- मा.महापौरजी, २४.९६ चा प्रस्ताव आहे. हा कुठला निधी आहे.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, २४.९६ हा निधी कुठला आहे.

अधिक्षक अभियंता (श्री तालेवार) :- मा.महापौरजी, हा जिल्हा नियोजन समितीकडून आलेला निधी आहे.

श्री.प्रविण दटके:-मा.महापौरजी, एक परिपत्रक असे आले आहे काय? की शासनाचा निधी महानगरपालिकेकडे आला आहे. त्याचे १ कोटी पर्यंतचे टेंडर काढण्याकरिता स्थायी समितीची परवानगी घेण्याची गरज नाही असे काही परिपत्रक आले आहे काय ?

अधिक्षक अभियंता (श्री तालेवार) :- मा.महापौरजी, एक राजपत्र आले आहे.

श्री.प्रविण दटके:- पत्र वाचण्यात यावे.

अधिक्षक अभियंता (श्री तालेवार) :- ( वाचले) महाराष्ट्र शासन राजपत्र, दिनांक ११ सप्टेंबर २०१९,महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चा कलम ७३ (क) मध्ये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा (वाचले) १०० कोटीच्या वरचा खर्च असेल तर स्थायी समितीकडे पाठवावे लागेल आणि १०० कोटी पेक्षा कमी खर्च असेल तर स्थायी समितीकडे पाठविण्याचीआवश्यकता नाही.

श्री.प्रविण दटके:- शासनाचे १०० कोटीचे वरचे प्रस्ताव आहेत ते पाठविले की नाही पाठविले. दुसरे येथे जे काम होणार आहे. २४.९४ लक्ष रुपयाच्या वरती परत काम होणार आहे काय? त्याचा या टेंडरमध्ये सहभाग होता काय?

अधिक्षक अभियंता (श्री तालेवार) :- दिनांक ११ सप्टेंबर २०१९ नंतर जर अशा निधीचा प्रस्ताव असेल तर पाठविले. त्या ठिकाणी आयसीओच्या निर्मितीकरिता करावयाची होती त्या त्याचे सुध्दा टेंडर बोलाविले होते. आयसीयूची वैद्यकीय विभागाकडून मागणी आली होती.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, कोव्हीड सदृश्य दवाखाना त्यामध्ये आयसीयू पाहिजे की नाही, वेन्टीलेटर पाहिजे की नाही, डॉक्टर पाहिजे की नाही , नर्स पाहिजे की नाही, वार्ड बॉय पाहिजे की नाही, टेक्निशियल पाहिजे की नाही. मा.महापौरजी हाच एकटा दवाखाना नाही. गांधी नगरचा २४.९७ पहिला माळा, दुसरा माळा २४.९७ सेम केस, के.टी.नगर आयसोलेशनचे उदाहरण सांगतो तेथे दवाखाना बांधून टाकला आता संडास, बाथरुमचे काम सुरु आहे. माझी माहिती आहे आपण तपासुन घ्यावी की काही अधिका-यांनी स्वत: पैसे देवून ते बांधणे सुरु केले आहे. ही स्थिती आहे या अधिका-यांची. एकीकडे आयुक्त सांगतात कायद्यात हे आहे ते आहे. आणि दुसरीकडे हे सांगतात आज ८ काढून टाकले, आज १७ काढून टाकले, ६९ काढून टाकले. मग स्मार्ट सिटीचा ओएसडी काढून टाकला. आपल्याकडे नविन ओ.एस.डी. नेमला हे यांचे कायद्यावर प्रेम असणे, लोकशाहीवर प्रेम असणे. मा.महापौरजी, माझी आपल्याला विनंती आहे. ज्या ज्या अधिका-याने हया फाईल तयार केल्या मग तो टी.ए. असेल, जे.ई.असेल, डेप्टी असेल, एक्झीकेटीव्ह असेल, ए.सी.असेल, त्या सर्वांवर ७२ (क) अंतर्गत कार्यवाही केली पाहिजे. त्यांना घरी पाठविले पाहिजे. आपल्या अकाऊंट सेक्शनमध्ये लोक प्रोव्हीजन तपासतात या हेडमध्ये किती पैसे आहेत, त्या हेडमध्ये किती पैसे आहेत. हा वर गेला काय, खाली गेला काय, या अकाऊंट सेक्शनच्या ही लोकांना या कलमा अंतर्गत लोकांमधून निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना नियमाप्रमाणे काम करण्यास अडचण निर्माण करतात त्या सर्व अधिका-यांवर कार्यवाही झाली पाहिजे अशी माझी विनंती आहे.

श्रीमती परिणिता फुके :- मा.महापौरजी, पाईंट ऑफ इन्फोमेशन, आता जो मुददा सुरु आहे रुग्णालयाच्या बाबतीत त्याबद्दल मला बोलायचे आहे. मा. महापौरजी, मा. प्रविण दटके बोलत असतांना इंदीरा गांधी रुग्णालयाचा विषय निघाला म्हणून हा विषय मी येथे घेत आहे. इंदीरा गांधी रुग्णालयाला महानगरपालिकेकडून फंड मिळाला. येथे ऑलरेडी एक वर्षापासून काम सुरु होते. हे होत असतांना जवळपास थ्रीफोर्थ काम झाले होते. नंतर आयुक्तांनी तेथे आयसोलेशन वार्डचा प्रस्ताव आणला. प्रभागातील कोणत्याही नगरसेवकांना माहीती न देता तेथे आयसोलेशन वार्ड आणण्याचे काम करण्यात आले. इमरजंसी फंड उपलब्ध करुन दिला. जो फंड महानगरनगरकडून मिळाला होता त्यातील १९ लक्षाचे काम व्हायचे होते तेथे सगळे काम आम्ही केल्यावर थोडे फिनिशिंगचे काम करुन ३ दिवसाआधीच आमच्या इंदिरा गांधी रुग्णालयाचा दौरा घेतला आणि छोटेशे आयसोलेशन वार्डाचे उदघाटन केले. मला आयुक्तांना विचारावयाचे आहे की अशी आपल्याला कोणती घाई होती की आपण छुपके पाव आले आणि उदघाटन करुन टाकले. आम्हांला सांगण्याची गरज वाटली नाही, अशी कोणती भिती होती. निदान महानगरपालिकेला सांगून तरी ते कार्य करावे. राधास्वामी मठ येथे ऑलरेडी कोरोना वार्ड बनविण्यात आला आहे. इंदिरा गांधी रुग्णालयात येथे कोणत्याही नागरिकांनी सांगितले नाही, असा कुणी प्रस्ताव दिला नाही. आमचा एरिया रेड झोन मध्ये नाही तर ग्रीन झोन मध्ये आहे. तेथे आयसोलेशन सेंटर कसे बनविले. तेथे सुरु असलेले काम बंद करुन आयसोलेशन वार्ड बनविला, कोव्हीडचे काम सुरु केले. स्वत: उदघाटन केले, त्यांची व्हिडीओ बनवून आम्ही शहरामध्ये कोव्हीडचे ५ रुग्णालय सुरु केले असे सांगत आहेत. आम्ही काय मुर्ख आहोत की दोन वर्षापासून त्या कामाचा फॉलोअप घेत आहे. मा.कुकरेजा साहेब जेव्हा स्थायी समिती अध्यक्ष होते त्यांनी फंड उपलब्ध करुन दिला . मागच्या वर्षी पासून जोराने काम सुरु होते. परंतु त्यांनी सांगितले की मी हे काम केलेले आहे हे माझ्या दृष्टीने बरोबर नाही.

श्री दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, तालेवार साहेबांना आपल्या माध्यमातुन मी विनंती करतो कि, के.टी.नगरच्या हॉस्पिटलवर एकुण खर्च किती झाला आहे. दुसरा याकरिता निधी डीपीडीसी मधुन मिळालेली आहे कि, आणखी कुठुन मिळाली आहे.

अधिक्षक अभियंता (श्री तालेवार) :- मा.महापौरजी, केटीनगरच्या कामाकरिता एकुण ८६ लक्ष ६२ हजार रुपयांचा निधी खर्च करण्यांत आलेला आहे.

श्री दयाशंकर तिवारी :- पाईंट ऑफ इंफार्मेशन, मा.महापौरजी, ८६ लाखांचे किती तुकडे आपण केले आहे.

अधिक्षक अभियंता (श्री तालेवार) :- मा.महापौरजी, याच्यामध्ये दोन इमारती आहे एका इमारतीमध्ये ३ लाख व एका इमारतीमध्ये २४.९६ लाख, ७.३२ लक्ष आणि याच्यामध्ये ४६ लक्ष रुपयांचा ऑक्सीजनचा वेगळा टेंडर काढण्यांत आला.

श्री दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, २४, ३ आणि ७ हे ८६ होत नाही. या ऑक्सीजन बरोबर आपण आय.सु.यु. चा सुध्दा टेंडर काढला असेल कारण काम वाढले आहे म्हणुन. म्हणजे आय.सु.सी. नाही राहिले असते तरी ऑक्सीजनची आवश्यकता भासली नसती. हे खरे आहे काय ?

अधिक्षक अभियंता (श्री तालेवार) :- हो तेथे स्वास्थ्य विभागाकडुन मागणी आली होती.

श्री दयाशंकर तिवारी :- आपण हॉस्पिटलचा कंसल्टेंट नेमले होता काय ?

अधिक्षक अभियंता (श्री तालेवार) :- नाही.

श्री दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, मी आपल्या माध्यमातुन विचारु इच्छितो कि हेल्थ विभागाच्या कोणत्या अधिका-यांनी कोणत्या तारखेला तेथे आयसीयु झाले पाहिजे असे पत्र तालेवार साहेब किंवा

आयुक्तांना दिले.

अधिक्षक अभियंता (श्री तालेवार) :- मा.महापौरजी, असे पत्र मला दिलेले नाही.

श्री दयाशंकर तिवारी :- आपल्या उदबोधनामध्ये आले कि स्वास्थ विभागाकडुन मागणी आली, ती मागणी काय होती.

अधिक्षक अभियंता (श्री तालेवार) :- दवाखान्याच्या संदर्भात चर्चा झाल्यानंतर आपण ते केले आहे.

श्री दयाशंकर तिवारी :- हॉयपोथेटीकली होती काय ? मा.महापौरजी, यह सारी चिजे है, कल मैंने एक प्रेस लिया, उस प्रेस मे पत्रकारो ने मुझ से पुंछा कि मा.आयुक्त सभा  क्यों नही लेने का बोल रहे है. मा.महापौरजी, तब मैंने कहां कि कोई व्यक्ति जब संविधान प्रदत्त नियमांतर्गत कामो मे बाधा उत्पन्न करने की चेष्ठा करता है तो उसका हेतु नियमबाहय होता है यह ग्राहय करने मे कोई अतिश्योक्ती नही है, मैंने उसका कारण बताया था,  या तो वह व्यकित्  नियमबाहय काम कर रहा है या तो उसके कामो मे भ्रष्टाचार है, या फिर वह जनप्रतिनिधीयो को बदनाम करने की चेष्ठा कर रहा है. मा.महापौरजी, मुझे पता नही था कि, प्रत्यक्ष को प्रमाण की आवश्यकता नही होती, मैंने कल कहा और आज सभागृह मे सब प्रत्यक्ष हो गया. जनप्रतिनिधी का अपमान निगम आयुक्त ने  यह कह कर कर दिया कि माझया मधात बोलायचे नाही. मा.महापौरजी, वह जिस पद पर बैठे है वह कानुन सम्मत काम करने के लिये बैठे है अगर वह निर्देश देकर कानुन के विपरीत काम करते है तो इससे बडा पाप और दुसरा कोई भी नही हो सकता. और यह स्टॅब्लीश हो रहा है और वह उस बात का उत्तर नही दे सकते थे, इसलिये उन्होने बहाना ढुंढा, बहाना, यह सभागृह की परंपरा है, अगर कोई बात किसी सदस्य ने कहा और वह बात पसंद नही है तो हम कहते है कि उस बात को सभागृह की कारवाई से बाहर करदो. इतना कह करके उस विषय को समाप्त किया जा सकता था लेकिन उसके बाद जो चर्चा होंगी उसपर उत्तर देने के लिये मैं काबिल नही हु, मुझे इस बात को स्विकृत करना पडेगा और वह स्विकृती मैंने अगर सभागृह मे करली तो वह बात गलत हो जायेगी. मा.महापौरजी, मैंने प्रेस मे कहा कि यह व्यक्ति सुपीरियटी कॉम्प्लेक्स से ग्रसित है, लेकिन इसमे इम्प्रेटीव्ह कॉम्पलेक्स भी है, मैंने उसके लिये यह शब्द ढूंढा है बोला एहसासे कमजरफी जो आदमी कुछ भी नही रहता और अपने आपको तोपखां समझ्ता हो तो उसको एहसासे कमजरफी बोलते है. मा.महापौरजी यह सारी चिज सभागृह मे स्थापित हो गयी इस सभागृह के सारे सदस्यो ने देखा, अधिकारीयो ने देखा, सभागृह के कर्मचारीयो ने देखा, इस सभागृह के पत्रकारो ने देखा, मा.महापौरजी, मेरा आपसे निवेदन है यह केवल एक फाईल नही है हर फाईल मे ऐसे तुकडे किये गये है, और मैंने बताया.

श्री तानाजी वनवे :- पाईंट ऑफ आर्डर, मा.महापौरजी, नंदलाल कमेटीचे तुकडयामध्ये काम करण्यासंबंधीचे काय दिशानिर्देश आहे, त्याची माहिती सादर करण्यांत यावी.

श्री दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, मैं आपके माध्यम से एक निवेदन करना चाहता हु कि, कोई व्यक्ति पलायन की भुमिका कब लेता है जिस समय उसके पास उत्तर न हो, ऐसी अवस्था मे वह पलायन की भुमिका लेता  है, हा हम तो सम्मानित लोग है सारी मानवता की जिम्मेदारी निर्वाचित प्रतिनिधियो ने ली है, आपने जो पत्र भेजा था उसका ७२ घंटे उत्तर नही मिला, यह पत्र भी आपने इसलिये भेजा था कि हमारे संवाद शुरु रहना चाहिये, समाप्त नही होना चाहिये, संवाद शुरु रखने के लिये संवेदनाऐ जिंदा रखने के लिये आपने पत्र भेजा था, मा.महापौरजी, उसका क्या उत्तर आया, उस पत्र का वाचन हम बाद मे कर लेगे. लेकिन मा.महापौरजी, एक व्यक्ति वारंवार वारंवार जनप्रतिनिधीयो की अव्हेलना करता है, नियम के विपरीत काम करता है, और उसके बावजूद वह यह स्थापित करने की कोशिश करता है कि, मैं मृत्यंजय हु, मैं फैन्टम हु, मैं जेम्स बॉन्ड हु, मै ट्रान्सफर और मृत्यु से नही डरता तो मा.महापौरजी, कोई व्यक्ति अगर इस

प्रकार की हरकत शासन की निधी से सभागृह की निधी से इसप्रकार से उसका उपयोग करके इस प्रकार की हरकत करता है, मा.महापौरजी, आप अभी सभागृह १० मिनिट के लिये स्थगित किजीये, मा.ज्येष्ठ सदस्य ने निवेदन किया है निगम आयुक्त को उनका पक्ष रखने के लिये बुलाया जाये, अगर वह आते है तो बहोत अच्छी बात है उसके बाद हम चर्चा करेगें, अगर नही आते है तो मा.सदस्य ने जो प्रश्न किया है तो ऐसी अवस्था मे हमने कौनसी कारवाई करनी चाहिये, इसपर आप त्वरीत आदेश दे, ऐसा मैं निवेदन करता हु.

महापौर : ही सभा १५ मिनिटाकरिता स्थगित करण्यांत येते.

हस्ता /— डॉ.रंजना लाडे
**निगम सचिव**
**महानगरपालिका, नागपूर**

हस्ता /— संदीप जोशी
**महापौर**
**महानगरपालिका, नागपूर**